# ऋणनिर्देशक

आयुष्यात नकळत आपल्याला कोणी ना कोणी मदत करत असते त्यामुळे त्याचे आभार मानले पाहिजे आणि ते आपले कर्तव्य असते. इतिहास विषय माझ्या आवडीचा आहे. तसेच मी मराठवाड्यात राहत असल्यामुळे येथील इतिहास जाणून घेऊन अभ्यास करावा या इच्छेमुळे मी हैदराबाद मुक्तिसंग्राम हा विषय शोधप्रबंधासाठी निवडला आहे . या संशोधन कार्याच्या वाटचालीत विविध मान्यवर आप्त स्वकीय हितचिंतक यांचे कळत-नकळत मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले आहे.

राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांची मी ऋणी आहे. तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ. अर्चना टाक मॅडम यांनी आम्हाला वेळोवेळी उत्तम असे मार्गदर्शन केले .तसेच इतिहास विभागातील डॉ. प्रियदर्शनी पाटील मॅडम व राहुल मोरे सर यांचीही आभारी आहे

या संशोधन कार्यासाठी माझ्या आदरणीय गुरुवर्य डॉ. प्रियदर्शनी पाटील मॅडम यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून या संशोधन कार्याला दिशा दिली त्यांच्या मार्गदर्शक हे कठीण कार्य पूर्ण हो शकले नसते त्यामुळे त्यांचे विशेष आभार मानणे प्रथम कर्तव्य ठरते .तसेच विभागातील

ग्रंथालयातील पुस्तके देण्यात आली त्यामुळे मी त्यांची आभारी आहे. तसेच राजश्री शाहू महाविद्यालय येथील ग्रंथपाल प्रा. डॉ. मस्के सर व सहाय्यक श्री. शेख, भोगिले,सौ. सावंत यांनी मला संशोधन कार्यासाठी आवश्यक असणारे ग्रंथ उपलब्ध करून दिले.

संशोधन प्रबंधाचे काम पूर्ण करण्यासाठी आदरणीय विवेक भोसले सरांनी पोस्टाने पुस्तके पाठवून मदत केली त्यांचीही मी आभारी आहे तसेच सतत प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या मैत्रिणी तनुजा कदम, पूजा येचेंवाड, यांचे अनमोल सहकार्य लाभले तसेच माझे श्री. रुपेश पाटील, आई सौ. वृषाली पाटील, यांनी मला आर्थिक व मानसिक प्रोत्साहन दिले याबद्दल मी त्यांची आभारी आहे. तसेच माझा मोठा भाऊ अभिजीत पाटील व गणेश पाटील, व माझी आत्या प्रियंका पाटील हिने मला अक्षर जुळवणी करण्यासाठी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले व मदत केली त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

पाटील साक्षी रुपेश

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | प्रकल्प अभ्यास  पद्धती | 1-22 |
| 2 | बालपण व प्राथमिक शिक्षण | 23-34 |
| 3 | हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यातील रॉबिन हूड | 35-50 |
| 4 | दत्तोबा भोसले यांचे कारागृहातील डायरीतील प्रगल्भ व पुरोगामी विचार | 51-53 |
| 5 | उपसंहार | 54-56 |
|  | निष्कर्ष | 57-58 |
|  | संदर्भसुची | 59-60 |
|  | छायाचित्रे | 61-66 |
|  | नकाशे | 67 |

# प्रकरण पहिले:

# प्रकल्प अभ्यास पद्धती

**प्रस्तावना:**

ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतात जवळपास 563 देशी राज्य आणि संस्थाने होती. या राज्यांचा आणि संस्थानांचा राज्यकारभार देशी राजे व संस्थानिक पहात असत. दक्षिण भारतात त्रावणकोर,बडोदा, कोल्हापूर, आणि हैदराबाद ही पाच राज्य होती. यामध्ये हैदराबादचे राज्य भौगोलिक आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे होते, म्हणून ते महत्त्वाचे होते. मुघल सम्राट औरंगजेब २० फेब्रुवारी 1707 रोजी मरण पावले. त्याच्यानंतर सत्तेवर आलेले मोगल सम्राट दुर्बल व कर्तृत्व हीन निघाले. याचाच फायदा घेऊन दक्षिणेचा सुभेदार मीर कमरुद्दिन चीन पोलीस खान निजाम उल मुल्क यांनी 31 जुलै 1724 रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या राज्याची राजधानी हैदराबाद होती. या राज्याच्या गादीवर वंशपरंपरेने होऊन गेलेल्या सत्ताधीशांना 'निजाम' व 'आसफजहा' या नावाने ओळखले जात असे .हैदराबाद राज्यात मराठवाडा तेलंगणा व कर्नाटक या प्रादेशिक विभागांचा समावेश होत होता .

18 जुलै 1947 रोजी ब्रिटिश सरकारने भारतीय स्वातंत्र्याचा कायदा पास केला. या कायद्यानुसार 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत ब्रिटिशांच्या राजकीय वर्चस्वातून मुक्त झाला. म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळाले

वरील कायद्यानुसार देशी राज्य आणि संस्थानि कांनाही त्यांनी आपले राज्य भारतात की पाकिस्तानात विलीन करावयाचे की ,स्वतंत्र राहायचे या बाबतीत स्वातंत्र्य दिलेले होते .त्यामुळे देशी राज्य व संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करून घ्यावयाची हा मोठा प्रश्न भारत सरकार पुढे निर्माण झाला. शेवटी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल, यांनी बहुतेक संस्थांनी भारतात विलीन करून घेतली; परंतु हैदराबाद राज्याचे सत्ताधीश निजाम मीर उस्मान अली खान यांनी 11 जून 1947 रोजी आपले राज्य स्वतंत्र राहणारअसल्याचीजाहीरकेले.

निजामाने आपले राज्य स्वतंत्र राहणार असल्याचे घोषित केल्यामुळे भारत सरकार आणि हैदराबाद राज्यातील जनतेपुढे मोठा पेच व प्रश्न निर्माण झाला. हैदराबाद राज्याचा सत्ताधीश मुसलमान होता; परंतु राज्यात 70 टक्के हिंदू ,18 टक्के दलित, 11% मुसलमान आणि 1% इतर लोक होते. तसेच निजामाची सत्ता आणि अत्याचारी होती. याशिवाय देशाच्या व दख्खनच्या मध्यभागी असलेले आणि देशात आकाराने दुसऱ्या क्रमांकाचे असलेले हैदराबाद राज्य स्वतंत्र आणि राज्यातील जनतेच्या नव्हे तर देशाच्या ही हिताचे नव्हते. तसेच हैदराबाद

राज्याच्या भारताला विलीनीकरणाशिवाय भारताच्या स्वातंत्र्याला पूर्णत्व प्राप्त होणार नव्हते. त्यामुळे राज्यातील जनतेने हैदराबाद राज्याचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्यासाठी सत्याग्रह आंदोलने केली.

या राज्याची पहिली राजधानी मराठवाड्यातील औरंगाबाद होती. यानंतर तेलंगणातील हैदराबाद हे राजधानीचे ठिकाण होते औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल सम्राट दुर्बल निघाले व याचाच फायदा घेऊन दक्षिणेचा सुभेदार मीर कमरुद्दिन यांनी 31 जुलै 1724 रोजी दक्षिणेत राज्याची स्थापना केली. ब्रिटिशांच्या अन्यायी सत्तेविरुद्ध भारतीयांनी युद्ध पुकारले शेवटी इंग्रजांनी स्वातंत्र्य कायदा जुलै 1947 मध्ये पास करून भारताला 15 ऑगस्ट 1947 मध्ये स्वातंत्र्य दिले भारतीय स्वातंत्र्य कायद्यानुसार संस्थान भारतात सामील व्हायचे की स्वतंत्र राहायचे याबाबत स्वातंत्र्य स्थानिकांना दिले होते त्यामुळे संस्थानिकांनी विलिनीकरणाचाप्रश्ननिर्माणकेला.

हैदराबाद संस्थान तेलंगणा, कर्नाटक आणि मराठवाडा या तीन विभागाने तयार झालेले होते. तेलंगणाचे 8 जिल्हे कर्नाटक 3 आणि मराठवाड्याचे 5 जिल्हे एकत्र येऊन निजामी राजवट अस्तित्वात आली होती. राज्याचे क्षेत्रफळ 82000 चौरस मैल आणि वार्षिक महसूल 26

कोटी रुपये होती अशा रीतीने हैदराबादचे जनता सामाजिक धार्मिक व सांस्कृतिक बंधनात जोडलेली होती.

भारतातील संस्थन पैकी एक सर्वात मोठे संस्थान म्हणून ओळखला जात होता. इ.स. सन 1724 इसवी सन 1948 या कालखंडात निजामाची सत्ता होती. मीर उस्मान अली खान याला हैदराबादचा निजाम म्हणून ओळखला जात असे एकूण सात निजाम होऊन गेले व जवळजवळ 224 वर्षे त्यांची कारकिर्दी होती. मीर उस्मान हा शेवटचा निजाम ठरला. त्याच्या कालावधी इसवी सन 1919 ते 1948 हा होता तो अत्यंत हट्टी जिद्दी महत्वकांक्षी व कुशाग्र बुद्धीचा होता सत्ता व पैसा या बळावर तो कोणत्याही थराला जात होता. कासिम रझवी अत्यंत माथेफिरू आणि उर्मट व हट्टी स्वभावाचा होता गुंडांची टोळी हाताशी बाळगायचा त्यांना बेधडक गुन्हे करायला लावायचे आणि त्यांची वकिली करून त्यांना सोडवायचे हीच टोळी इतरत्रही वापरावयाची आणि अशा रीतीने दरारा प्रस्थापित करावयाचा हा कासिम रझवी एक खाक्या होता. कासिम रझवी लष्करी वापरात असे आणि स्वतःला फील मार्शल म्हणून घेत असे.

हैदराबाद संस्थानातील विशेषता मराठवाड्याचा सहभाग फार महत्त्वाचा होता .निजाम या सरकारच्या सत्तेच्या अत्याचाराच्या विरोधात

व त्यांच्या रझाकार अत्याचाराच्या विरोधात मराठवाडा ते हैदराबाद संस्थानामध्ये अनेक समाज घटकांनी नोंदवला होता व त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करण्याचे कार्य महिलांनी केले होते. ताराबाई परांजपे, दगडाबाई शेळके, आशाताई वाघमारे, प्रतिभाताई वैशंपायन , या स्त्रियांनी हैदराबाद साठी मोलाचे योगदान दिले आहे.

निजामाने आपल्या प्रजेला मध्ययुगीन काळात डांबुन ठेवलेले होते. त्यांने शिक्षणाकडे हेतूत दुर्लक्ष केले जगात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी प्रयत्न केले जात होते.'शिक्षण हे वाघिणीचे दूध असते जो हे दूध पितो तो गुरगुरतोच 'आणि म्हणूनच शिक्षणाची हेळसांड निजामांनी जाणीवपूर्वक केली काळाबरोबर पाहून उचलण्याचे निजामाने नाकारले भविष्याकडे पाठ फिरवून तो उलट्या पावलाने चालत होता

एखाद्या व्यक्तीच्या जीवनात आणि सर्वसाधारणपणे समाजात शिक्षणाला महत्त्वाचे स्थान असते. तसेच राष्ट्राच्या विकासातही शिक्षणाची भूमिका महत्त्वाची असते कारण त्यावरच देशाची उभारणी होते. आर्थिक विकास प्रशासकीय यंत्रणेची कार्य क्षमता शिक्षणाच्या स्वरूपावर अवलंबून असतात. त्याचप्रमाणे सामाजिक आणि सांस्कृतिक विकास हे शिक्षणाच्या स्वरूपावर अवलंबून असते.

हैदराबाद संस्थानात उर्दू हे शिक्षणाचे माध्यम होते सर्व प्राथमिक माध्यमिक शाळा शासनामार्फत चालवल्या जात होत्या संस्थानातील शाळांना पुढील प्रमाणे भाषा होत्या पहिलीच्या वर्गाला अव्वल, दुसरीच्या वर्गाला दुय्यम, तिसरी सूअम, चौथी चहा रूम, पाचवीला पंचम, सहावी शशुम, सातवीला हाफ्तुम, आठवीला हशतुम, नववी नसुन, दहावीला दहम असे म्हटले जाई तर शाळेत जाण्यासाठीचा पोशाख ही निजामी पद्धतीचा असे पाय घोळ व झब्बा व डोक्यावर रुमी टोपी घालावी लागायची.

हैदराबाद संस्थानातील दलित, समाज मुस्लिम व हिंदू, या दोघांच्याही गुलामगिरीत जीवन जगत होता. अस्पृश्यतेमुळे त्यांना समाज व्यवस्थेत खालचे स्थान होते. त्यांना सार्वजनिक मंदिरे व विहिरीवर प्रवेश करण्यास बंदी होती. त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता हैदराबाद राज्यातील जनतेने सुरू केलेले. सशस्त्र चळवळ आणि सरकारच्या अन्याय अत्याचार भारत सरकार लक्ष ठेवून होते. भारतीय संघराज्यात निजाम आपले राज्य विलीन करण्यास तयार होते नसल्यामुळे भारत सरकारला 13 सप्टेंबर 1948 रोजी हैदराबाद राज्यावर पोलीस कारवाई करावी लागली या घटनेस पोलो ऑपरेशन असेही म्हणतात. परंतु लष्करी कारवाई

म्हटल्यास आंतरराष्ट्रीय वाद निर्माण होईल म्हणून या कारवाईस कायदे म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी पोलीस ॲक्शन असे नाव देण्यास भारत सरकारला सुचविले कारण पोलीस ॲक्शन मुळे हा प्रश्न भारताचा अंतर्गत प्रश्न ठरला होता.

हैदराबाद स्टेट काँग्रेसने स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद संस्थानात आंदोलनात सामील होऊन दलितांनी निजामाची लढा द्यावा कारण निजाम हा आपला व आपल्या मातृ-भूमीचा शत्रू आहे असा आदेश डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संस्थानातील दलितांना दिला त्यांनी दलितांना आवाहन केले की हिंदुस्तान हे आपले घर आहे आपले वतन आहे ही गोष्ट अस्पृश्य त्यांनी कधीही विसरता कामा नये.

हैदराबाद मधील परिस्थिती मोठ्या संघर्षाच्या दिशेने जात होती जुलै सुरुवातीला हैदराबादला एखाद्या लष्करी छावणीचे स्वरूप आले होते सिडनी कॉटन या ऑस्ट्रेलियन वैमानिकांच्या माध्यमातून कराची हुन गोवा मार्गे रात्रीच्या अंधारात संस्थानातील बीदर व वरगंल येथे शस्त्रे उतरवली जात होती संस्थानात अनेक हत्याकांड घडत होते त्यात गोर्टा हत्याकांड आणि शोएब खान यांची हैदराबाद शहरातच रझाकार यांनी

केलेली हत्या व त्या घटनांमुळे पंडित नेहरू यांच्या मनातील द्विधा निर्माण झाली होती.

निजामाने जाणीवपूर्वक भारतात वाटाघाटीत अडकवून वेळकाढूपणा चे धोरण अवलंबले होते कासीम रझवी या काळात अत्यंत ढाम वक्तव्य करत होता. संस्थानात रझाकारा च्या कारवयात प्रचंड वाढ होत होती. हिंदू जनता भयभीत झाली होती या काळात आपण शांत राहून चालणार नाही याची जाणीव वल्लभ भाईंना होती. दरम्यान निजामाला भरपूर सवलती देणारा करार वॉल्टर मॅक्टन यांनी माउंट बॅटन यांच्या मध्यस्थीने सरदार पटेल कडून मंजूर करून घेतला होता. पण आपल्या सुदैवाने खुद्द निजामाने व आणि त्यांच्या सल्ला गारा नीच हा करार फेटाळून लावला या सर्व घडामोडीमुळे माउंट बॅटन अतिशय निराश झाला. कासिम रझवी ने हस्तक्षेप केल्यामुळेच हैदराबादने ही संधी गमावली मात्र भारतासाठी हा विजय ठरला आता कोणत्याही क्षणी हैदराबाद मध्ये हस्तक्षेप करण्याचा नैतिक अधिकार भारताला प्राप्त झाला.

ऑपरेशन पोलो हे पोलीस अॅक्शन व ऑपरेशन केट पिलर अशा वेगवेगळ्या नावांनी या लढ्याला ओळखले जाते हैदराबाद मुक्ति संग्रामा चे आंदोलन शांततेच्या व अहिंसेच्या मार्गाने व्हावे यासाठी स्वामी

रामानंद तीर्थ हे आग्रही होते मात्र निजाम व त्याची रझाकार सेना त्यांचे अत्याचार पराकोटीला गेले होते. यामुळे सरदार पटेल यांच्या सूचनेवरून 13 सप्टेंबर 1948 रोजी भारताने चारी बाजूने भारतीय सेना हैदराबाद संस्थानात घुसवली व 17 सप्टेंबर 1948 रोजी हे ऑपरेशन यशस्वी रित्या पार पडले या पाच दिवस चाललेल्या ऑपरेशन मध्ये रझाकार संघटनेने 1373 तर हैदराबाद स्टेट चे 807 सैनिक भारत सरकारचे 66 जवान शहीद झाले तर भारताचे 87 जवान जखमी झाले 17 सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजल्या च्या सुमारास निजाम मीर उस्मान आली यांनी आम्ही भारतीय सामिल नाम्यावर सह्या करत असल्याची घोषणा केली व त्यानंतर 18 सप्टेंबर 1948 रोजी सामील नाम्यावर सह्या केल्या.

ऑपरेशन पोलो हे सप्टेंबर 1948 मध्ये भारतीय लष्कराच्या गुप्त ऑपरेशन नाव होते त्यात हैदराबादचा शेवटचा निजाम सत्तेवरून गेला आणि हैदराबादला भारताचा एक भाग बनवण्यात आले. हे लक्षात घेण्यासारखे आहे की भारताच्या स्वातंत्र्यानंतर जेव्हा भारतीय संघाची स्थापना होत होती तेव्हा हैद्राबाद निजामाने शरणागती पत्कारली हैद्राबादला स्वातंत्र्य संस्थान विलीनीकरण झाले.

हैदराबाद संस्थानाचा विचार केला तर तेलगू ,मराठी आणि कन्नड अशा 3 भाषिक विभागांत हैदराबाद राज्य पसरले होते. एकूण 17 जिल्ह्यांपैकी 9 जिल्ह्यांचा तेलंगणा, 5 जिल्ह्यांचा मराठवाडा, आणि 3 जिल्ह्यांचा कर्नाटक असा हा निजामाचा प्रदेश होता. हैदराबाद संस्थानात तही स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले याचे नेतृत्व प्रामुख्याने स्वामी रामानंद तीर्थ, वामनराव नाईक, केशवराव कोलटकर, दिगंबर राव बिंड , गोविंदभाई श्राफ, भाऊसाहेब वैशंपायन, आनंद कृष्ण वाघमारे, शाम रावजी बोधनकर, बाबासाहेब परांजपे, देवसिंग चव्हाण, याचबरोबर विठ्ठलराव काटकर, सूर्यभान पवार, दत्तोबा भोसले इत्यादी सारख्या नेत्यांमुळे मोलाची कामगिरी बजावली.

श्री दत्तोबा भोसले ही मातोळा या गावचे रहिवासी होते, एका शेतकऱ्याच्या मुलगा, वारा नाकात शिरल्यानंतर घोडा जसा मस्ती उधळतो तसे या तरुणाचे झाले होते. स्वातंत्र्याचे वारे या तरुणाच्या नाकात शिरले होते .आणि त्याने हैद्राबादच्या मुक्ती लढ्यात मागचा पुढचा विचार न करता आपल्या सर्व शक्ती निशी त्यांनी उडी घेतली घरादारावर तुळशीपत्र ठेवून तो स्वातंत्र्यलढ्यात बेभान होऊन उतरले त्याच्या अंगी नेतृत्व गुण प्रचंड प्रमाणात होते शिक्षणाची आवड

लहानपणीच मनात निर्माण झाली होती. मातोळा या शाळेत होते या शाळेने विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रवादी देशभक्ती आणि स्वातंत्र्याची सकस बीजे पेरली दत्तोबा यांचा स्वभाव करारी धाडसी व स्वाभिमानी होता त्याचे तीन नंबरचे बंधू तुकाराम भोसले यांच्यावर दत्तोबा च्य व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव व धाक होता ते काठीचा स्वर संरक्षणासाठी उपयोग करायचे अंगाभोवती ते काठी फिरवत असत. त्यामुळे कोणीही शत्रू त्यांना स्पर्श करू शकत नसे. बडोदा ने दत्तू भोसले यांना दृष्टी दिली आणि आत्मविश्वास दिला बडोदा हून दत्तू भोसले परतले तेव्हा हैदराबाद मुक्ती लढ्याला चांगलेच तोंड फुटले होते.

दत्तू भोसले या स्वतंत्र सैनिकांचे नाव रझाकार च्या कानावर पडताच त्याचा थरकाप व्हायचा त्याच्या पांढऱ्या शुभ्र घोडी ने त्याला अद्भुत असे साथ दिली भूमिगत राहून प्राणाची बाजी त्याने लावली अनेक रझाकार ना त्यांने कंठस्नान घातले. चिंचोली बार्शी कॅम्पवर अनेक तरुणांना लढण्याचे प्रशिक्षण या तरुणांनी दिले. घोडेस्वारी, दांडपट्टा आणि तलवार बाजी ते अगदी तरबेज होते. त्यांच्या हातातील काठी ही जणू त्यांची सहचारिणी होती. खरे तर क्रांतिवीर दत्तोबा भोसले रझाकार चे कर्दनकाळ बनले त्यांच्या डोळ्यात तेज व आवाजात जरब होती.

निजामाच्या जुलमी आणि धर्मवेड्या अन्यायी राज सत्तेला खाली खेचण्याची शपथ त्यांनी घेतली. त्यांच्या मनातील उर्मी गप्प बसू देत नव्हती स्वातंत्र्याची ज्योत त्यांच्यात अंतःकरणात ते हिप्परगा राष्ट्रीय शाळेत असताना स्वामी रामानंद तीर्थ यांनी पेटवली होती ती तशीच तेवत होती.

**2)प्रकल्प अभ्यासाची निवड:**

प्रस्तुत प्रकल्प अभ्यास विषयासाठी लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील मातोळा गावातील हैदराबाद मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात अफाट असे योगदान देणारे नेतृत्व दत्तोबा भोसले याच विषयाची निवड करण्यात आली आहे.

**3) पूर्व अभ्यासाचा आढावा:**

हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यातील दत्तोबा भोसले हा विषय मी प्रस्तुत प्रकल्प अभ्यासासाठी निवडला आहे. अभ्यास विषय निवडत असताना याची काळजी घेतली जाते की संबंधित विषयावर यापूर्वी संशोधन सर्वांगाने झालेले नसावे यापूर्वी हैदराबाद मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात दत्तोबा भोसले यांचे काय योगदान दिले आहे हे क्वचित

जणांना माहिती असेल यांच्यावर अनेक संशोधन झाले असतील अनेक लेखणी ही प्रकाशित झाले आहेत परंतु राजश्री शाहू महाविद्यालयात (स्वायत्त) लातूर यातील इतिहास विभागाला आतापर्यंत सादर केलेल्या संशोधन विषयांमध्ये यापूर्वी कोणीही या विषयावर याची निवड केलेली नाही या विषयावर कमी अधिक प्रमाणात संदर्भ साधने आहेत.

**4) अभ्यासाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत संशोधन करण्यास आणि विषय व्याप्ती समजून घेण्यासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे:

1. महाराष्ट्रातील विविध प्रादेशिक विभागांपैकी मराठवाडा प्रादेशिक विभागातील लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील मातोळा गावातील क्रांतीवीर दत्तोबा भोसले मातोळा कर यांचा अभ्यास करणे.

2. क्रांतिकारी नेतृत्वाच्या माध्यमातून निर्माण झालेले नेतृत्व गुणांचा अभ्यास करणे.

3. क्रांतिकारी वारसा घेऊन हैदराबादचा विकास कसा झाला याचा अभ्यास करणे.

4. क्रांतिवीर दत्तोबा भोसले यांचा नेतृत्वाचा चौफेर व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे.

5. लातूर जिल्ह्यातील हैदराबाद मुक्ति संग्रामाला आधारभूत घटक कोणते.

**5) अभ्यासाचे महत्त्व:**

सदर नेतृत्वाचा अभ्यास हा अनेक अंगानी महत्त्वपूर्ण आहे क्रांतिवीर दत्तोबा भोसले या क्रांती काराने नेतृत्वाच्या दूर दृष्टी मुळे हैदराबाद निजामाच्या तावडीतून मुक्त झाले आणि एक सक्षम असे क्रांतिकारी धाडसी नेतृत्व म्हणून ही नेतृत्व लातूर नावारूपाला आले. क्रांतिवीर दत्तोबा भोसले या क्रांतिकारी नेतृत्वाने अनेक जबाबदाऱ्या पार पडल्या आहेत त्यासाठी अनेक धाडसी काम केले आहेत.

सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती तुन सोडविण्यासाठी महाराष्ट्राला जे योगदान मिळाले ते तर महत्त्वाचे तसेच परंतु त्यांनी दिलेले योगदान हे अधिक शाश्वत असते या सर्व पार्श्वभूमीवर या क्रांतिकारी नेतृत्वाने केलेले कार्य आणि त्यांच्यातील क्रांतिकारी नेतृत्वाने

दिलेले योगदान यांच्या अभ्यासातून क्रांतिकारी विचारांनी घराण्यातील क्रांतिकारी नेतृत्वाचे नवे आकार घेताना दिसते.

## 6) प्रकल्प अभ्यास विषयाची व्याप्ती व मर्यादा:

वरील नेतृत्वाचा क्रांतिकारी कार्याच्या अभ्यासाबरोबरच त्यांचे परस्पर संघटनेतील योगदान त्यांचे नेतृत्वगुण त्यांनी निझाम पासून मराठ्यांचे रक्षण कसे करण्यात यावे यावर विशेष भर दिले आहे चरित्रात्मक भाग अपरिहार्यता स्वरूपात आला असून नेतृत्वाची पायाभरणी व तात्कालीन परिस्थिती याचा ही आढावा घेण्यात आला आहे.

## 7) प्रकल्प अभ्यासाचे उद्देश:

प्रस्तुत संशोधन प्रबंधासाठी मराठवाडा मुक्ती संग्राम या विषयाची निवड करण्यात आली. आहे हैदराबाद मुक्तिसंग्राम हा भारतीय स्वातंत्र्याची परिपूर्ती करणारा लढा म्हणून ओळखला जातो. या लढ्यात मराठवाड्यातील जनतेने मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला होता. याचे उद्देश पुढील प्रमाणे:

- या ऐतिहासिक लढ्याची नव्या पिढीला माहिती व्हावी.

- या लढ्यातील प्राथमिक बाबींची.
- या लढ्यातील दुर्लक्षित घटनांना उजाळा मिळावा हा यामागील उद्देश आहे.

**8) प्रकल्प अभ्यासाचे गृहितके:**

कोणत्याही घटनेचे स्पष्टीकरण किंवा उत्पादन करण्यासाठी एखादी कल्पना गृहीत धरावी लागते व तिच्या अनुषंगाने त्या घटनेचा अर्थ लावावा लागतो. तो अर्थ जर वास्तव घटना समजण्यास अनुकूल व अनुरूप ठरला तर गृहीत धरलेले कल्पना ग्राह्य ठरते.

**9) माहिती संकलनाचे स्त्रोत्र:**

हा लेख पूर्ण करण्यासाठी विविध स्त्रोतांची मदत झाली ते खालील प्रमाणे:

- पुस्तके/ग्रंथ
- छायाचित्रे
- वर्तमानपत्रातील लेख व बातम्या
- आत्मचरित्रपर ग्रंथ
- प्रश्नावली

- विविध अहवाल
- हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाशी निगडित इंटरनेटवरील विविध वेबसाइट्स

  उदा:www.latur.gov.in

**प्रकरण विभागणी:**

या प्रकल्प विषयाची मी पाच प्रकरणांमध्ये विभागणी केली आहे ती खालील प्रमाणे:

1) **प्रकल्प अभ्यास पद्धती:**

प्रकरणांमध्ये या प्रकल्पाकरिता वापरण्यात येणारे संशोधन पद्धतीचा आढावा घेण्यात येणार आहे. संशोधनासाठी प्रस्तुत विषयाची निवड केल्यानंतर त्या विषयाचे महत्त्व, गरज ,उद्दिष्टे, व्याप्ती व मर्यादा मांडण्यात येणार आहे.

2) **बालपण व प्राथमिक शिक्षण:**

दत्तोबा भोसले यांचा जन्म व त्यांची हिप्परगाच्या राष्ट्रीय शाळेत व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली व त्यानंतर हायस्कूल शिक्षणापासून कुस्तीमध्ये रस वाटू लागले. त्यानंतर महाविद्यालयीन

जीवनात त्यांनी कुस्तीमध्ये प्राविण्य कसे मिळवले याची सविस्तर ओळख व या विषयाची उपयुक्तता या प्रस्तुत प्रकरणात मांडण्यात येणार आहे.

**3) हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यातील रॉबिन हूड:**

दत्तोबा भोसले यांनी निजामांशी कसे दोन हात केले . क्रांतिसिंह नाना पाटील , यांच्या बरोबरील संबंध तसेच सेलू हप्त्याची लुट, नाईक चाकूर पोलीस स्टेशनवर छापा, याचाही सविस्तर आढावा आपण या प्रकरणात घेणार आहोत.

**4) दत्तोबा भोसले यांचे कारागृहातील डायरीचे प्रगल्भ व पुरोगामी विचार:**

दत्तोबा भोसले डायरी लिहिण्याचा छंद होता. तलवार आणि लेखणी दोन्ही राष्ट्रभक्तीतून निर्माण झाले होते .कारागृहात त्यांनी लिहिलेल्या रोजनिशीतील लेख आपण या प्रकरणात घेणार आहोत.

**5) उपसंहार:**

या प्रकरणात संपूर्ण प्रकल्पाचा सारांश मांडण्यात येणार आहे.

# प्रकरण दुसरेः

# बालपण आणि प्राथमिक शिक्षण

## बालपण व प्राथमिक शिक्षण:

क्रांतीवीर दत्तोबा भोसले यांचा जन्म मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील मातोळा या गावी एका सर्वसामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबात १९ नोव्हेंबर १९१८ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव ईश्वरराव लिंबाजी भोसले होते. ईश्वरराव ,गयाबाई, भागीरथीबाई , दत्तोबा, ग्यानराज, सजानबाई व तुकाराम ही सहा अपत्ये झाली तर काशीबाई पासून मारुती हा मुलगा झाला. ईश्वर भोसले हे गावातील एक मोठी आसामी होती. गावात त्यांना मान, सन्मान होता. त्यांचं व्यक्तिमत्त्व उंच व धिप्पाड होतं. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातही त्यांचा आदरयुक्त दरारा होता. भोसले कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवर चालत असे. जुन्या काळात घराणेशाही किंवा ज्यांच्याकडे खूप मोठी 'आसामी' असायची. त्यांच्याकडे 'चौसोपी वाडा' किंवा 'गढी' असायची. त्या वाड्यात किंवा गढीत माणसांचा एक प्रकारे जिव्हाळा, संवाद किंवा एकोपा जपला जायचा. एक प्रकारचं ते सजीव पण होतं. मातोळा येथेही ईश्वरराव भोसले यांचा मोठा वाडा होता. तो त्यांच्याच नावाने ओळखला जाई व त्याला 'ईश्वरवाडा' असे म्हटले जाई. ईश्वरव वाडयाच्या बाहेरील बाजूस जवळ-जवळ पाच फुटाची मोठी रुंद भिंत होती. वाड्याचे बांधकाम मजबूत, उंच असे होते. वाड्याच्या समोरील बाजूस एक चिरेबंदी मोठा लाकडी दरवाजा होता. ईश्वर रावांची सर्व भावंडे मिळून मिसळून वाड्यात राहायची. या वाड्यातच दत्तोबा चे बालपण गेले. १८९४ साली मातोळा येथे केंद्रीय प्राथमिक शाळा सुरु झालेली होती. त्या शाळेत दत्तोबा नी उर्दू तून प्राथमिक शिक्षण घेतले. दत्तोबा च्या मनात शिक्षण, व्यायाम व कुस्तीची आवड बालपणीच निर्माण झाली होती. त्यामुळे त्यांनी पुढील शिक्षणासाठी

उस्मानाबाद जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील 'हिप्परगा या गावी जाण्याचे ठरविले.

## हिप्परगेच्या राष्ट्रीय शाळेत व्यक्तिमत्त्वाची जडणघडणः

हिप्परगे या गावात श्री. अनंतराव कुलकर्णी व व्यंकटराव कुलकर्णी ह्या बंधूद्वयांनी १९२१ साली 'राष्ट्रीय शाळा हिप्परगे' या खासगी संस्थेची स्थापना केलेली होती. या संस्थेत दत्तोबांच्या शिक्षणाला १९२८-३० ला सुरुवात झाली. मातोळा ते हिप्परगे हे अंतर साधारणतः १५ कि.मी. पेक्षा अधिक होते. तेवढे अंतर दत्तोबा पायी चालत जात होते. हिप्परगेच्या या संस्थेत स्वामी रामानंद तीर्थ हे त्यावेळी मुख्याध्यापक होते. या राष्ट्रीय शाळेत राष्ट्रभक्तीचे शिक्षण दिले जात असे. श्री. चंद्रशेखर वाजपेयी, श्री. विश्वंभरराव हराळकर, श्री. देवीसिंह चौहान, श्री. नारायणराव लोहारेकर, श्रीधरराव उर्फ बाबासाहेब घुटे आदी विद्यार्थीही त्याच शाळेत शिकत होते. दत्तोबांनी आपल्या व्यक्तीमत्त्वाने शिक्षकांचे व स्वामी रामानंदतीर्थ यांचे लक्ष वेधून घेतले. "हा दत्तोबा भविष्यात पराक्रमी शूर निघेल." असे उद्‌गार स्वामी रामानंदतीर्थ यांनी त्यावेळी काढले होते आणि भविष्यात ते खरेही ठरले. हिप्परगे येथे 'शारीरिक शिक्षण' या विषयासाठी श्री. अमृत बाबाराव भोसले उर्फ दादाराव गुरुजींची निवड केलेली होती. हे गुरुजी दत्तोबांचे गुरुच होते. दत्तोबांनी सतत तीन वर्षे 'अखिल भारतीय हिंद विजय जिमखाना, बडोदा' येथील कुस्तीच्या फडातून विजय ढाल मिळवून शाळेचे नाव झळकविले होते. अशा या शाळेला मराठीतील पहिले ज्ञानपीठ विजेते साहित्यिक वि. स. खांडेकर यांनी पहिल्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्यावेळी एकदा भेटही दिली होती. पुढे १९३५ साली दत्तोबांनी हिप्परग्याची शाळा सोडली.

## हायस्कूल शिक्षणः

७ जून १९३५ ला दत्तोबांनी सोलापूर येथील हरिभाई देवकरण हायस्कूलमधे प्रवेश घेतला. तेथे ते मराठा वसतीगृहात राहत, तेथेही त्यांनी क्रीडाक्षेत्रात आपले नाव कमावले. 'जीवन योगायोगापेक्षा कर्तृत्त्वावर अवलंबून असते' हे दत्तोबा सतत सिद्ध करत होते. परिस्थिती चोहोबाजूने प्रतिकूल होती. क्रीडाक्षेत्रात शहरी भागातील विद्यार्थ्यांचे वर्चस्व होते. तरीदेखील दत्तोबांनी त्यांच्याशी यशस्वीपणे स्पर्धा केली. शालेय क्रीडा क्षेत्रातही हायस्कूलमध्ये ते गाजले. कुस्ती, मल्लखांब, करेला. आट्यापाट्या, खो-खो, धावणे अशा खेळात त्यांनी चांगले नाव कमविले. हैद्राबाद संस्थान व सोलापूर येथे क्रीडाक्षेत्रात पारितोषिके व नावलौकिक मिळविला. संस्कृत व इंग्रजी भाषेवरही त्यांनी प्रभुत्त्व मिळविले. या शाळेत दीड ते पावणेदोन वर्षे त्यांनी शिक्षण घेतले. त्यानंतर ३१ जानेवारी १९३७ ला सोलापूरचे हरिभाई देवकरण हायस्कूल त्यांनी सोडले. त्यावेळी ते सातवी नापास होते व त्यांचे वय १९ वर्षे झालेले होते. परंतु पुढील शिक्षणाची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती म्हणून त्यांनी बडोदा गाठले.

## महाविद्यालयीन शिक्षण व कुस्तीमध्ये प्राविण्यः

१९३७ साली दत्तोबा पुढील शिक्षणासाठी बडोदा येथे गेले. त्या काळात शिक्षणासाठी बडोदा सारख्या दूरच्या ठिकाणी जाणे ही आश्चर्य वाटावी अशीच घटना होती. दत्तोबा नी आपली बुद्धीमत्ता व खेळातील नैपुण्य बडोद्यातील शाळा व महाविद्यालयामध्ये दाखविले. बडोद्यातील वातावरणाचा दत्तोबा च्या मनावर प्रभाव पडला होता. बडोदा मध्ये 'प्रोफेसर माणिकराव' यांची दत्तोबा नी भेट

घेतली. प्रो. राजरत्न माणिकराव यांनी दत्तोबा चे कसदार बांधेसूद शरीर व मल्लखांब, कुस्त्या, लाठी वगैरे इतर शारीरिक शिक्षणाच्या प्रकारातील प्रावीण्य पाहिले. त्यांनी दत्तोबा ना पहिला प्रश्न विचारला, "तू हिप्परग्या च्या शाळेचा विद्यार्थी का?" त्यावर दत्तोबा म्हणाले, "होय, मी हिप्परगा या शाळेचा च विद्यार्थी आहे." हिप्परगा येथे त्या काळात चांगले शारीरिक शिक्षण दिले जात होते याची कल्पना प्रो. राजरत्न माणिकराव यांना होती. त्यानंतर त्यांनी दत्तोबा विषयी सर्व माहिती घेतली आणि पुढे आपल्या माणिकराव आखाड्यात दत्तोबा ना ठेवून घेतले. तेथेच दत्तोबाची राहण्याची जेवणाची वगैरे सोय झाली. आखाड्यात दत्तोबा त्या काळात चांगल्या कसलेल्या व नामवंत पहिलवाना बरोबर कुस्त्या खेळत. म्हणून माणिकराव दत्तोबाना शाबासकी देत व त्यांची पाठ थोपटत व माणिकरावा च्या आखाड्यात असताना दत्तोबानी 'गामा रेसलर' या प्रसिद्ध मल्लाशी त्या काळात कुस्ती खेळली होती. कारण त्याच काळामध्ये गामाचे वास्तव्य बडोद्याला होते. त्याची सासुर वाडीही बडोद्याचीच होती. माणिकरावाच्या आखाड्यात सरावासाठी तो नेहमी येत असे. त्याच काळात दत्तोबा ही आखाड्यात कुस्तीचे धडे घेत होते. मात्र दोघांपैकी कोण विजयी झालं हे गुलदस्त्यातच राहिलं. पहिलवान लोक मानेच्या स्नायूंना बळकटी यावी म्हणून दगडाची गोल रिंग वापरत. तिला 'Stone Wheel' किंवा 'गार नाल' म्हणत. त्या काळातील पहिलवान ती वापरत असत. दत्तोबा, गामा ही पहिलवान मंडळी ती रिंग आवर्जून वापरत. ती रिंग आजही माणिकराव आखाड्याच्या संग्रहात आहे.

## गर्व्हनर जनरल लॉर्ड लिनलिथगो यांच्या हस्ते 'गोल्ड मेडल' व बडोद्यात भव्य सत्कारः

इंटरमिजीएट वर्गात दत्तोबा शिकत असतांना प्रतिवर्षाप्रमाणे 'इंटरमिजीएट' इंटर कॉलेजेस स्पोर्ट होत असत. दत्तोबांनी त्यात आखाड्यातील सरावाच्या जोरावर भाग घेतला. विशिष्ट मोठ्या गटात कुस्तीत पहिला नंबर पटकाविला. त्यात दत्तोबांना तत्कालीन भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड लिनलिथगो यांच्या हस्ते जानेवारी १९४० ला 'गोल्ड मेडल' व प्रशस्तीप्रक मिळाले व बडोद्यात त्यांचा भव्य सत्कारही आयोजित करण्यात आला होता. तसेच काही दिवसांनी दिल्लीच्या अखिल भारतीय कुस्त्यांच्या स्पर्धामध्ये त्यांनी भाग घेतला. व मिडलवेटच्या कुस्त्यांमध्ये प्रथम क्रमाकारी मिळवला होता.

## हैद्राबाद मुक्तीसंग्रामात स्वतःला झोकून दिलेः

हैद्राबाद मुक्तिसंग्राम मराठवाड्यातील ज्या स्वातंत्र्य वीरांनी अजरामर केला. अशा अग्रगण्य स्वातंत्र्य सैनिकांमध्ये श्री. दत्तोबा भोसले (मातोळकर) याचे स्थान बहुमोलाचे मानले जाते. त्यांच्याकडे या चळवळीचे नेतृत्व होते. ते काळाची गरज ओळखून कार्य करणारे कर्तव्यदक्ष पुरुष होते. त्यांच्या अंगी नेतृत्त्व गुण प्रचंड प्रमाणात होते. एखादा राक्षस आपल्या आईच्या रक्ताचे घोट घेऊ लागला तर तिच्या पुत्राने ते निमूटपणे पाहावे का? 'मराठवाडा' या आपल्या मायभूमीला आपण मुक्त करणार आहोत.

"गे माय भू तुझे फेडीन पांग सारे

आणील आरतीला हे चंद्र सूर्य तारे"

असा भाव दत्तोबांच्या अंतर्यामी अंकुरला. "मराठवाड्याचे स्वातंत्र्य हो मानवतेची गरज आहे. महाराष्ट्राची भूक आहे. इतिहासाची हाक आहे. अशी त्यांची धारणा बनली. माझ्या मराठवाड्याला निझामाच्या जोखडातून मुक्त करीलच, त्याला स्वातंत्र्य मिळवून देईलच. त्याशिवाय स्वस्थ बसणार नाही." या ध्येयाने पेटलेल्या दत्तोबांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यात उडी घेतली.

## चिंचोली कॅम्पच्या निर्मितीत सिंहाचा वाटा:

चिंचोली कॅम्पच्या निर्मितीत दत्तोबा भोसले यांचा सिंहाचा वाटा होता. चिंचोली येथे निळकंठेश्वराच्या मंदिरात हा कॅम्प होता. या मंदिरात मध्यरात्री दत्तोबा व त्यांच्या सहकाऱ्यांच्या बैठका होत. दत्तोबा दिवसभर तेथे थांबत नसत. त्यांचे खरे काम मध्यरात्री सुरु होई. ते व त्यांचे सहकारी वेगवेगळ्या दिशेने शस्त्रानिशी कूच करत. पहाटे ३ ते ४ च्या सुमारास ते पुन्हा कॅम्पवर परतत. ते व त्यांचे सहकारी तासन् तास पायी हिंडत. निझाम संस्थानातील हल्ल्यासाठी आवश्यक ती माहिती गोळा करत. संस्थानातील खेड्यापाड्यामध्ये ते रात्री जात. लोकांच्या गाठीभेटी घेत. त्यांच्याशी चर्चा करत. दत्तोबा कधीकधी चांदण्या रात्रीत चालतांना क्रांतीचे गीतही गुणगुणत. ते लोकांना म्हणत, "आम्हाला खाऊन-पिऊन काटक करा. धष्टपुष्ट करा. चांगले ताकदवान, शक्तीवान बनवा. कारण आम्हाला उद्या स्वातंत्र्यासाठी बळी जायचे आहे." तसेच ते संस्थानात फिरत असतांना सर्व भागांची बारकाईने टेहळणी करत. खडा न् खडा माहिती

गोळा करत. काही ठिकाणी माहिती गोळा करण्यासाठी ते आपले गुप्तहेर सोडत. गुप्तहेराकडून माहिती मिळविल्यानंतर कुठे हल्ला करायचा? कुठे अचानक जाऊन छापा टाकायचा ? किती तारखेला टाकायचा? काणत्या वेळेला टाकायचा? हे सर्व ते निश्चित करत. त्याचे नियोजन करत.

## गौडगाव कॅम्पमध्ये शिस्तबद्ध कार्यकर्त्यांचे मोहोळ निर्माण केले:

गौडगाव कॅम्पच्या निर्मितीतही दत्तोबांचा मोलाचा सहभाग होता. या कॅम्पमध्ये दत्तोबांनी शिस्तबद्ध कार्यकर्त्यांचे मोहोळ निर्माळ केले. प्रत्येक कार्यकर्त्यात वैचारिक देवाणघेवाण निर्माण केली. आपल्या या कार्यात त्यांनी जनतेचाही सहभाग मिळविला. दत्तोबा कार्यकर्त्यांना नियोजनबद्धरित्या कार्यक्रम आखून देत असत व त्यांची अंमलबजावणी होते की नाही, यावर त्यांचा कटाक्ष असे. या कॅम्पची स्थापना फेब्रुवारी १९४८ मध्ये केली होती.

गौडगावच्या काकडे यांच्या वाड्यात हा कॅम्प चालत असे. कॅम्पमध्ये एकुण दीडशे ते सव्वा दोनशे सैनिक होते. या कॅम्पमध्ये श्री. रामभाऊ जाव चिलवडीकर, श्री. नरहरराव ग. मालखरे, श्री. शिवाजीराव नाडे, श्री. नामदेवराव रानडे, श्री. राजाभाऊ कुलकर्णी आदी स्वातंत्र्यसैनिकांचा सहभाग होता. या कॅम्पतर्फे माणकेश्वर, उफळाई, ढोकी, मानेगाव येथील कारवाया चालत. सरकारी शस्त्रे हस्तगत करण्यात येथील सैनिकांना दत्तोबांनी पटाईत केले होते. दत्तोबांनी या कॅम्पमध्ये रेकदृष्ट्या समाजवादी विचाराने भारलेले कार्यकर्ते एकत्र केले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजाचे स्वरुप काय असावे? याचे चित्र स्पष्ट करण्याचा प्रयत्नही दत्तोबांनी या कॅम्पच्या माध्यमातून केला.

## रझाकारांशी लढण्यासाठी सुसज्ज रहाः

कळंब परिसरात गुंडूपाशा या रझाकाराच्या म्होरक्याने दरारा निर्माण केलेला होता. परंतु तो धानोऱ्याच्या पहिलवानांना मनातून दचकूनच राहत असे. कारण त्यांचे दत्तोबांशी घनिष्ठ संबंध होते. धानोऱ्यात जवळपास ५० ते ६० पहिलवान होते आणि हे सर्व दत्तोबांच्या संपर्कात होते. दत्तोबा त्या पहिलवानांना मार्गदर्शन करीत व म्हणत, "आपल्याला निझामाची सत्ता येथून उलथून लावायची आहे. त्यामुळे तुम्ही आता सावध राहून कामे करायला हवी. रझाकारांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवायला हवी. आपले शारीरिक बळ वाढविण्याबरोबरच आता आपल्याला रझाकारांच्या अन्यायाशीही लढावे लागणार आहे. त्यामुळे तुम्ही सुसज्ज रहा. गुंडूपाशावर व त्याच्या साथीदारांवर नजर ठेवा." असे दत्तोबा पहिलवानांना सांगत असत.

## तडवळे कॅम्पच्या माध्यमातून गौरला आश्रयः

कळंब तालुक्यातील गौरगाव. निझामाच्या काळात गौर, वाघोली, मोहा, खामसवाडी, धानोरा, काजळा या भागात दत्तोबांनी कॅम्प निर्मिती केलेली होती. त्यांनी तडवळे येथे १०० स्वातंत्र्यसैनिकांचा कॅम्प तयार केलेला होता. दत्तोबा व त्यांचे सहकारी निझाम हद्दीतील खामसवाडी, गौर, वाघोली, सारोळा, आदि ठिकाणचे करोडगिरी नाके, रझाकार केंद्रे व पोलीसठाण्यांवर हल्ले करीत. हल्ले केल्यानंतर ते सोलापूरच्या हद्दीत आश्रय घेत. गौरच्या लगत येडशी, तडवळे ही सोलापूर जिल्ह्यातील गावे होती. तडवळे येथे तर दत्तोबांचा कॅम्पच असल्यामुळे त्यांनी या गावांमध्ये क्रांतीसिंह नाना पाटलांना आणले. हजारोंच्या

संख्येने त्यांच्या सभा घेतल्या. निझामाविरुद्ध वातावरण पेटविले. त्यामुळे या परिसरात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. बऱ्याच तरुणांना दत्तोबांनी चिंचोली, तडवळे कॅम्पकडे आकर्षित केले. कारण दत्तोबा हैद्राबाद मुक्तीसाठी चिंचोली, तडवळे आदी कॅम्पवरून रात्रंदिवस धडपड करत होते. त्याचवेळी त्यांनी तरुणांच्या मदतीने गौरगावला आश्रय देण्याचा प्रयत्न केला.

## दत्तोबांचे सैनिक म्हणजे धगधगते अंगार 'मारीन किंवा मरेन':

वाघदरी, घोळसगाव व मुस्ती कॅम्प निर्मितीतही दत्तोबांचे योगदान मोलाचे ठरले. सरहद्दीवरील या सर्व कॅम्पमधील सैनिकांना दत्तोबांनी लढ्याचे प्रशिक्षण दिले. बिकटप्रसंगी 'मारीन किंवा मरेन' या ईर्षा तरुणांच्या मनात पेटविल्या होत्या. दत्तोबांनी तयार केलेले स्वातंत्र्यसैनिक म्हणजे धगधगते अंगार होते. 'भारतमाता' हे स्फूर्तीस्थान दत्तोबांनी त्यांच्या मनात निर्माण केले होते. 'कासीम रझवी झिंदाबाद' असा नारा ऐकू आला की, त्यांच्या नरडीचा घोट घेण्यासाठी दत्तोबांचे सैनिक बेभान व बेफाम होत.

## अपसिंगेत स्वातंत्र्यसैनिक व रझाकारांमध्ये चकमक; १७ ते १८ रझाकार ठार:

निझामाने चिलवडी गाव जाळून टाकले होते. याची आग दत्तोबा व चिलवडीचे स्वातंत्र्य सेनानी श्री. रामभाऊ जाधव यांच्या मनात धुमसत होती. त्यामुळे दत्तोबा, रामभाऊ जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी विचारविनिमय केला. अपसिंग्याविषयी माहिती घेतली. अपसिंगा हे गाव तुळजापूरपासून ४ कि.मी. अंतरावर होते. तेथे करोडगिरी नाका, पोलीसस्टेशन व रोहिले, पठाण,

रझाकारांचाही अड्डा होता. 'अपसिंग्यावर जर आपण हल्ला केला तर निझामाला दरदरून घाम फुटेल' अशी कल्पना दत्तोबा, रामभाऊ जाधव व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या मनात आली. सर्वांनी मिळून अपसिंग्यावर हल्ला करण्याचा कट आखला. त्याप्रमाणे नियोजन केले. परंतु घात झाला होता. 'चिंचोली कॅम्पवरील स्वातंत्र्यसैनिक अपसिंग्यावर चालून येत आहेत', अशी माहिती कुणीतरी फंदफितूरीने रोहिले व रझाकारांना दिली. त्यामुळे रोहिले, पठाण, रझाकार व पोलीसही सावध झालेले होते. स्वातंत्र्यसैनिकांना याची कल्पना नव्हती. स्वातंत्र्यसैनिक व रझाकारांमध्ये गोळीबार झाला. या गोळीबारात श्रीधर वर्तक हे स्वातंत्र्यसैनिक ठार झाले. उस्मानाबादच्या डी.वाय.एस.पी. ने श्रीधर वर्तक यांचे शव आपल्या गाडीला बांधले आणि उस्मानाबादपर्यंत फरपटत नेले. वर्तकांच्या बलिदानाचा बदला घेण्यासाठी दत्तोबा, श्री. रामभाऊ जाधव व त्यांचे सहकारी पुन्हा कामाला लागले. ह्याचा शेवटी बदला घेऊन अपसींगा पोलीस ठाणे त्यांनी जाळून काढले.

## दत्तोबा आणि सोलापूरचे कलेक्टर घाडगेसाहेब:

दत्तोबा हे सीमेवरील गावांकरीता कॅम्प चालवत होते आणि सीमेवरील गावांबद्दल सोलापूरचे तत्कालिन कलेक्टर संभाजीराव घाडगे यांच्या मनात सहानुभूती होती. उस्मानाबादचा तत्कालिन कलेक्टर महंमद हैदर याने चिलवडी गाव अक्षरशः जाळले होते. त्यावेळी चिलवडीचे स्वातंत्र्य सेनानी श्री. रामभाऊ जाधव हे अतिशय खवळले होते. दत्तोबा, श्री. रामभाऊ जाधव व चिलवडी परिसरातील सर्व स्वातंत्र्यसैनिक एकत्र आले. त्यांनी ही बातमी घाडगेसाहेबांपर्यंत पोहोचविली. त्यानंतर घाडगेसाहेब चिलवडीत दाखल झाले

होते. दत्तोबा आणि घाडगेसाहेब यांचे संबंध चांगले होते. 'दत्तोबा, रामभाऊ जाधव व त्यांचे सहकारी सीमेवरील भागात कॅम्प चालवितात. निझामी जुलमापासून ते रयतेचे संरक्षण करत आहेत. त्यामुळे त्यांना आपण मदत केलीच पाहिजे. या विचाराने कलेक्टर संभाजीराव घाडगे, दत्तोबा, रामभाऊ जाधव व त्यांच्या सहकार्यांना मदत करत.

## मराठवाड्यातील प्रतिसरकार 'मुक्तापूर' स्वराज्य स्थापनेत सक्रिय सहभागः

उस्मानाबाद-बाश तालुक्यांच्या बॉर्डरवर बरेच कॅम्प होते. चिंचोळी हा त्यापैकी एक महत्त्वाचा कॅम्प होता. या कॅम्पवरील दत्तोबा व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी मिळून निझामी हद्दीतील जवळपास ६५ गावे मुक्त केली होती आणि मुक्त केलेल्या त्या गावांना 'मुक्तापूर स्वराज्य' असे नाव दिले होते. मुक्तापूर स्वराज्याच्या कारभारी मंडळामध्ये सर्वश्री दत्तोबा ईश्वर भोसले, श्री. बाबासाहेब परांजपे, कै. फुलचंद गांधी, अण्णाराव पाटील, रामचंद्र मंत्री, विठ्ठलराव पाटील जामगावकर, मुरुमकर, रामभाऊ जाधव, चंद्रशेखर बाजपेयी, मालखरे, शेषराव वाघमारे, कॅ. जोशी, भगवान तोडकरी, गोपालदेव, राजेंद्र देशमुख, जड्डे गुरुजी आदींचा समावेश होता. मुक्तापूर स्वराज्याचे प्रशासन प्रमुख म्हणून कै.व्यं.बा. ऊर्फ कॅप्टन जोशी यांनी सलामी स्वीकारली होती.

# प्रकरण तिसरे:

# हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यातील रॉबिन हूड

## प्रति नाना पाटीलः

क्रांतीसिंह नाना पाटील यांनी ज्याप्रमाणे इंग्रजांना 'सळो की पळो' करून सोडले होते, अगदी त्याचप्रमाणे दत्तोबांनींही निझाम व रझाकारांना पळती भुई थोडी केली होती. मराठवाड्यात आणि विशेषतः उस्मानाबाद जिल्ह्यातील लोक दत्तोबांना 'मिनी नाना पाटीलच' म्हणत असत. उस्मानाबाद परिसरातील बऱ्याच गावांशी दत्तोबांचा संपर्क होता. अनेक गावांमध्ये दत्तोबांनी सोडगे दलाची स्थापना करून गावांना संरक्षण दिले होते. भंडारी, उजनी या गावांशीही दत्तोबांचा खूप संपर्क होता. भंडारीचे पोलीस पाटील रंगराव अण्णा पाटील व श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी यांच्याशी दत्तोबांचा घनिष्ट संबंध होता. दत्तोबा हे स्वतः खूप धाडसी व धैर्यवान होते. त्यांच्याबरोबर नेहमी आठ ते दहा हत्यारबंद स्वातंत्र्यसैनिकांचा लवाजमा असे. श्री. रंगराव अण्णा पाटील व श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी यांच्याशी दत्तोबांचा नेहमी संपर्क असे. दत्तोबा व त्यांच्या सहकाऱ्यांच्या साथीनेच गावरक्षणाचे काम श्री. रंगराव अण्णा पाटील व श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी हे करत असत. दत्तोबांचा व त्यांच्या सहकाऱ्यांचा रझाकारांवर मोठा वचक होता. दत्तोबांचे काम हे गुप्तपणे चालत असे. निझामशाहीच्या राज्यात बहुतांश पोलीस हे मुस्लिम होते. ते दिवसा पोलीसाचे काम करत होते. तर रात्री वेशांतर करुन दरोडा घालत होते. तसेच दरोडा टाकणाऱ्यांनाही साथ देत होते. भविष्यात निझामी राजवटीला धोका आहे. हे निझामाचा हस्तक कासीम रझवी याने ओळखले. म्हणून त्याने निझामी राजवटीवर येणाऱ्या संकटाला तोंड देण्यासाठी जोरदार तयारी चालविली होती. त्याने प्रत्येक पोलीस स्टेशनला सावधगिरी बाळगण्याचे आदेश दिले होते. तो ज्या उस्मानाबाद, लातूर भागात

राहत होता, त्या भागातील मुस्लिम मंडळींस हेडक्वॉर्टरला तो बोलावून घेत असे. तेथेच त्यांची जेवणाची वगैरे व्यवस्था करत असे. तेथे त्यांना आठ दिवस रायफल चालविण्याचे प्रशिक्षणही देण्यात येई. त्याचबरोबर त्याने रायफल मोफत वाटण्याचीही योजना आखली होती.

एवढेच नव्हे तर त्याने प्रशिक्षण घेतलेल्या लोकांना डाके, दरोडे, खंडणी वसूल करण्याचेही सक्त आदेश दिले होते. त्याप्रमाणे उस्मानाबाद परिसरातील मुस्लिम लोक प्रशिक्षणाबरोबर रायफलसहित गावा-गावात आले होते. ते दिवसाढवळ्या गावा-गावात हवेत बंदुकीचा वार करून हिंदूवर दहशत निर्माण करत होते. काही मुस्लिम मंडळी 'पाहुण्यांच्या गावी जात आहोत' असे निमित्त करून गावी गैरहजर राहत व रात्री गुंडांच्या टोळीत सामील होऊन डाके, दरोडे टाकण्याचे काम करत होते. अशा प्रकारचा धुमाकूळ उस्मानाबाद परिसरात अधिकच वाढला होता. याला तोंड देण्यासाठी दत्तोबांनी ठिकठिकाणी सशस्त्र कॅम्प उघडलेच होते. त्याबरोबरच तरुणांना प्रशिक्षण देण्याचेही काम सुरुच ठेवले होते. दत्तोबांनी जवळे दुमाला येथे प्रशिक्षण देण्यासाठी परिसरातील पाच ते सहा गावातील पंचवीस ते तीस लोकांची निवड केली होती. त्यांना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याकरीता मुंबईला जाऊन, प्रशिक्षण घेऊन येण्याचा बेत दत्तोबांनी आखला होता.

मुंबईला जाण्यापूर्वी त्या लोकांना सर्वप्रथम दत्तोबांनी 'भंडारी' या गावी मुक्कामास ठेवले होते. दत्तोबांच्या मार्गदर्शनाखाली भंडारी गावचे पोलीसपाटील श्री. रंगराव अण्णा पाटील आणि श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी यांनी त्या

सर्व लोकांची चोख व्यवस्था ठेवली होती. विठ्ठलरावांचे चिरंजीव श्री. राजेंद्र सूर्यवंशी व त्यांच्या बालमित्रांनी या मंडळीची उत्तमपणे बडदास्त ठेवली होती.

परिसरातील तरुणांना अशा प्रकारे प्रशिक्षण देण्याचे कामही दत्तोबानी सुरुच ठेवले होते. मुंबईला प्रशिक्षण घेण्यासाठी श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी व भंडारी चे कर्तबगार पोलीस पाटील श्री. रंगराव अण्णा पाटील या पंचवीस ते तीस तरुण बरोबर जाणार होते. परंतु श्री. रंगराव अण्णा पाटील यांनी पूर्वीच त्र्यंबकेश्वरला जाण्याचा बेत निश्चित केला होता. त्यामुळे ते जाऊ शकले नव्हते. ते थेट त्र्यंबकेश्वर लाच निघून गेले होते. श्री. राजेंद्र सूर्यवंशी त्या काळात गावात दहा ते बारा मुलांची रात्रीची शिकवणी घेत. एकदा शिकवणी सुरु होती. १० वाजले होते. त्याचवेळी रस्त्याने काही माणसे पळत येत होती. त्यांच्या हातात बॅटऱ्या होत्या. त्यांच्या पावलांचा टपटप् आवाज येत होता. तो आवाज ऐकून शिकवणी तील दोन विद्यार्थी धावत पळतच तिकडे गेले अन् पाच मिनिटातच काठीचा मार खाऊन परतले. ते पूर्णपणे घाबरले होते. त्यांच्या अंगाचा थरकाप सुरू होता. थरकाप सुरू असतानांच, 'रंगराव अण्णांच्या घरावर दरोडा पडला, रंगराव अण्णांच्या घरावर दरोडा पडला.' असं ते बडबडत होते. हे ऐकताच श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी धावत पळतच तिकडे गेले. त्यांच्या पाठीमागे गावातील इतरही लोक पळत गेले. बघता बघता सर्व गाव गोळा झाला.

जमलेल्या सर्व गावकऱ्यांनी दगड गोळा केले व दगडांनीच ते दरोडे खोरांवर मारा करू लागले. परंतु दरोडे खोरांजवळ बॅटऱ्या होत्या. त्या बॅटऱ्या ते गावकऱ्यांच्या डोळ्यावर चमकवू लागले. त्यामुळे गावकऱ्यांना विशेष असे काही करता येईना. शिवाय दरोडेखोर बंदुकीने सारखा हवेत गोळीबार करत

होते. त्यातील काही दरोडेखोर तेवढ्या वेळात सर्व सोने-नाणे, पैसा अडका घेऊन गावाबाहेर पडले.

दरोडेखोरांचा गावकऱ्यांनी खूप पाठलाग केला. गावकरी व दरोडेखोरांच्या झटापटीत श्री. केशव नावाच्या एका मागासवर्गीय समाजातील माणसाने आगळ (घर बंद करण्याचे आडवे लाकूड) डोक्यात घाळून एक दरोडेखोर मारला. त्यामुळे दरोडेखोर अधिकच चवताळले. 'मारो साले को' असे म्हणत त्यांनी केशववर हल्ला चढविला. दरोडेखोरांनी केलेल्या हल्ल्यात केशव जागीच गतप्राण झाला. त्यानंतर दरोडेखोर त्यांच्या मृत साथीदाराचे प्रेत घेऊन तेथून पसार झाले. इकडे गावकरीही केशवचे प्रेत घेऊन गावात परतले. त्यानंतर गावकऱ्यांनी झालेल्या घटनेबद्दल रीतसर पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. परंतु डाका घालणारीही निझामाचीच माणसे, तक्रार दाखल करुन घेणारेही तेच व चौकशी करणारेही तीच माणसे असल्यामुळे या प्रकरणावर पडदा पडला. ही खबर जेव्हा दत्तोबांना लागली तेव्हा ते तात्काळ भंडारी गावी आले. त्यांनी गावकऱ्यांची एक सभा बोलाविली. त्या सभेत गावच्या रक्षणासाठी काय करता येईल ? हा विचारविनिमय झाला. त्यानंतर दत्तोबांनी दहा-दहा लोकांचा एक गट तयार केला. असे एकूण सात गट तयार केले. दररोज रात्री ८ ते सकाळी ६ वाजेपर्यंत काठ्या, कुऱ्हाडी घेऊन गावाला गस्त घालून संरक्षण देण्याचे ठरले. या गटाला 'सोडगे दल' म्हटले जाई. त्याप्रमाणे दररोज एक गट रात्रभर गावरक्षणाचे काम करु लागला. तरीही एक दिवस गावच्या चावडीला गुंड लोकांनी एक मोठा कागद अडकविला. त्या कागदावर असे लिहिले होते की, 'आम्ही हत्यारबंद लोक दोन दिवसांनी भंडारीला येत

आहोत. सकाळी साधारणतः आम्ही ११ वाजता गावात येऊ.काँग्रेसी गुंडांपासून निझामशाहीचे रक्षण करण्याकरीता आम्हाला दहा हजार रुपये खंडणी हवी आहे. त्या खंडणीच्या वसूलीसाठी आम्ही तेथे येत असून. आम्ही आल्यानंतर ताबडतोब खंडणीचे ते पैसे देण्यात यावे, पैसे न दिल्यास आम्ही सर्व गाव फुंकून टाकू' अशी धमकी त्या कागदावर लिहिलेल्या मजकूरात दिलेली होती. त्यावेळी श्री. रंगराव अण्णा पाटील व श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी यांनीही ही बाब दत्तोबांच्या कानावर घातली. दत्तोबांनी या दोघांशी सल्ला मसलत केली व पुढील नियोजन केले. काय करायचे याची सर्व माहिती दोघांना समजावून सांगितली. दत्तोबांच्या मार्गदर्शनाखाली व नियोजनानुसार दोघांनीही पुढील तयारी केली. ठरल्याप्रमाणे त्या तारखेला सकाळी ११.०० वाजता दोन बैलगाड्या भरून रायफलधारी पोलीस, साध्या मुस्लिमी वेशात चार ते पाच गुंड लोक व काही रायफलधारी पोलीसही पायी चालत भंडारी गावी आले. त्यावेळी श्री. रंगराव अण्णा पाटील, श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी व गावकरी त्यांना भेटले. त्यांची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर गावाबाहेर श्री. रंगराव अण्णांचे शेत होते. त्या शेतातील पिराकडे त्यांना घेऊन गेले. तेथे त्यांच्यासाठी खास मटनाचा बेत तयार करण्यात आला होता. तसेच दारुचीही व्यवस्था केली होती. गावकऱ्यांनी त्यांना भरपूर दारू पाजली. चमचमीत असे खमंग पोटभर मटन खाऊ घातले. त्यानंतर सर्व निघण्याच्या तयारीत होते. त्याचवेळी त्यातील साध्या वेशातील दलालांनी श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी व श्री. रंगराव अण्णा पाटील या दोघांना थोडेसे बाजूला घेतले व हळूच कानात सांगितले, "काँग्रेसी गुंड लोकांपासून निझामशाहीचे रक्षण करणे गरजेचे आहे. त्यासाठी आम्हाला पैशांची गरज आहे. म्हणून आम्हाला दहा हजार रुपयाची खंडणी ताबडतोब

द्यावी." श्री. रंगराव अण्णा पाटील व श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी यांच्याशी दलालांचा अशा प्रकारचा संवाद सुरु असतांनाच दत्तोबांनी नियोजन केल्याप्रमाणे एक घोडेस्वार धावत येत असल्याचा दलालांना दिसला. तो जोरजोराने 'दत्तोबा दहा-पाच मिनिटात येतील'. असे म्हणून ओरडत होता. हा सर्व प्रकार ऐकून पोलीस गडबडले. त्यांचा एकच गोंधळ उडाळा. काय करावे ? हे त्यांना उमजेना. ते भयभीत झाले व सगळेच्या सगळे पोलीस ताबडतोब गाडीत जाऊन बसले. 'गाववालों को बाद में देख लेंगे' असे पुटपुटत गावच्या लोकांना शिव्याशाप देत निघून गेले, जवळच उजनी गाव होते. त्या गावी रायफलधारी रोहिल्यांची संख्या खूप होती. म्हणून ते दिवसभर तेथेच त्यांच्या आश्रयाला राहिले. दिवस मावळला. सर्वत्र काळोख पसरला. त्या काळोखाच्या आश्रयाने कुणाला नकळत रातोरात ते पोलीसस्टेशनला निघून गेले. अशा प्रकारे रझाकारांच्या गुंडशाहीला व निझामशाहीच्या दडपशाहीला दत्तोबा क्रांतीसिंह नाना पाटलांप्रमाणे नियोजन करुन, त्यांना गुंगारा देऊन पळती भुई थोडी करीत असत. त्यांच्यावर कडक वचक ठेवून, गावांना संरक्षण देत असत. त्यामुळे त्या-त्या गावचे लोक दत्तोबांवर विश्वास ठेवून बिनधास्त जीवन जगत होते. दत्तोबा रात्रंदिवस बंदक बरोबर घेऊन गावा-गावांचे रक्षण करत होते. त्याच काळात एक घटना घडली. भंडारी गावाजवळ 'वडवळा' म्हणून गाव आहे. त्या गावातील एक मुलगी सोलापूरला दिलेली होती. ती मुलगी एक दिवस 'वडवळा' या गावी आपल्या माहेरी आली. ती विठ्ठलराव सूर्यवंशी यांची नातेवाईक होती. एक दिवस विठ्ठलरावांचे चिरंजीव राजेंद्र व त्यांचे बालमित्र 'वडवळा' या गावी नातेवाईकांकडे भेटायला म्हणून गेले होते. त्यावेळी त्या माहेरी आलेल्या मुलीने राजेंद्र व त्यांच्या बालमित्रांना सांगितले की, '५ ऑगस्ट १९४७ ला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आहे. मी

स्वातंत्र्याचा सोहळा पाहूनच वडवळ्याला आले आहे." तिने असे सांगितल्यानंतर राजेंद्र व त्यांचे बालमित्र भंडारी गावी आले. त्यांनी तिरंगी झेंडे तयार केले. ते तिरंगी झेंडे गावातील सर्व झाडांवर, देवळांच्या चावडीवर लावले. दुसऱ्या दिवशी गावातून वाजत-गाजत मिरवणूक काढली. एक जाहीर सभाही घेतली. परंतु त्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, 'फक्त भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे. निझामाचे राज्य हे आहे तसेच आहे. मराठवाड्याला अजून स्वातंत्र्य मिळालेले नाही.' तेव्हा गावात सर्वत्र नाराजी पसरली. झालेल्या प्रकाराबद्दल सर्व गावालाच निझाम सरकारची नोटीस आली व पोलीसस्टेशनला हजर राहण्याबद्दल सक्त ताकीद देण्यात आली. त्यावेळी गावचे कारभारी श्री. रंगराव अण्णा पाटील व श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी हे दत्तोबांना जाऊन भेटले. दत्तोबांजवळ जाऊन त्यांनी झालेली कैफियत मांडली. दत्तोबा तात्काळ भंडारी गावी आले. त्यांनी सर्व गावकऱ्यांशी चर्चा केली. श्री. रंगराव अण्णा पाटील व श्री. विठ्ठलराव सूर्यवंशी यांना बरोबर घेतले. ते थेट लोहारा पोलीसस्टेशनला गेले. दत्तोबांच्या त्या भागातील कारवायामुळे पोलीस दत्तोबांना वचकून होते. त्यांनी दत्तोबांना बघताच प्रकरण मिटवून घेतले. त्यामुळे भंडारी गावावर आलेले संकट टळले होते. अशा अनेक गावांना दत्तोबांनी संकटातून वाचविले होते. म्हणून त्या परिसरातील लोक दत्तोबांचा उल्लेख 'मिनी नाना पाटील' असाच करीत.

## क्रांतीसिंह नाना पाटील आणि दत्तोबा:

क्रांतीकारी दत्तोबा अभ्यासू, धोरणी व चाणाक्ष होते. पश्चिम महाराष्ट्रात ज्याप्रमाणे क्रांतीसिंह नाना पाटील यांनी इंग्रजांविरुद्ध चळवळ सुरू कैली होती.

अगदी त्याच पद्धतीने आपणही आपल्या भागात कॅम्पचे कार्य करावे असे दत्तोबांना वाटत होते. म्हणून ते काही दिवस सातारा जिल्ह्यात नाना पाटलांकडे गेले. क्रांतीसिंह नाना पाटील व त्यांच्या पत्रीसरकारच्या कार्यकर्त्यांशी त्यांनी चर्चा केली. नाना पाटलांची सर्व क्रांतीकारी चळवळ समजून घेतली. क्रांतीचे डावपेच जाणून घेतले आणि मराठवाड्यातही त्यांनी पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे क्रांतीकारी चळवळगतिमानकेली.

## उपळे गावच्या व्यापाऱ्यांना संरक्षण:

उपळे, वाघोली, जवळे, काजळा ही गावे बार्शी तालुक्यात होती. या गावांना मोठा बाजार बार्शीचा होता. उपळे (माकडाचे) गावच्या लोकांना आठवडी बाजार करण्यासाठी येडशीला जावे लागायचे. आळणी नाक्यावर निझामाचे ठाणे होते. आळणी गाव निझामाच्या ताब्यात होते. इंग्रज आणि निझाम यांची हद्द म्हणजे आळणी नाका. निझाम सरकारचा दाखला (पाचनिशाने) दाखवूनच इंग्रजी मुलुखात प्रवेश करावा लागायचा. कारण हदबंदी होती. उपळे (माकडाचे), वाघोली आणि काजळा या गावांसाठी किराणा मालाची खरेदी बार्शीला होत असे.

बार्शीहून रेल्वेने येडशी येथे भुसार माल येत असे. तेथून तो माल बैलगाड्यांनी उपळा, वाघोली, काजळा येथे आणला जात असे. हा माल आणण्यासाठी तीस-चाळीस बैलगाड्या लागत असत. या गाड्याबरोबर दत्तोबा भोसले आपला घोडा घेऊन असत. त्यांच्याबरोबर बंदूक, तलवार, हातबाँम्ब, काठ्या इत्यादी हत्यारे असत. युनियनचे (इंग्रज) अकरा पोलीस असत. अशा संरक्षणात उपळे (माकडाचे) गावाला भुसार माल येत असे. दत्तोबा भोसले यांचा

चांगलाच वचक निझामाच्या सैन्यावर होता. उपळे गावाच्या संरक्षणासाठी दत्तोबांनी या गावात सोडगे दलही निर्माण केले होते.

## काजळा गावचे हल्‍ले परतविले:

काजळा येथे दत्तोबा भोसले मातोळकर यांचा कॅम्प आहे; याची माहिती रझाकारांना समजली होती. म्हणून त्यांनी काजळा कॅम्पवर दि.१४ एप्रिल १९४८ रोजी अचानक हल्‍ला करण्याचे ठरविले. दत्तोबांना या गोष्टीची गुप्तहेरांकडून माहिती मिळाली. त्यांनी तात्काळ आपले क्रांतीवीर काजळा परिसरात पेरून ठेवले. स्वतः ते सारोळा काजळा हद्दीवर दबा धरुन बसले. सावज टप्प्यात येताच दत्तोबांनी हातबॉम्ब व बंदुकीच्या साहाय्याने त्यांच्यावर अचानक हल्‍ला केला व रझाकारांना परतावून लावले. रझाकारांनी दि. २६ ऑगस्ट १९४८ रोजी काजळा कॅम्पवर दुसरा हल्‍ला केला होता. हा हल्‍ला त्यांनी दारफळहून केला होता. त्यावेळी त्यांनी संपूर्ण काजळ्याची नाकेबंदी केली होती. तरीदेखील क्रांतीकारकांनी खड्डे घेऊन त्यात बोरीच्या काट्या टाकून त्यांना अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी क्रांतीकारक व रझाकारांमध्ये धुमश्रक्री उडाली. धुमश्चक्रीत शंकर मसे हे क्रांतीकारक रझाकारांच्या हल्‍ल्यात बळी पडले. इंग्रज सरकारने काजळा गावाला पोलीस संरक्षण दिलेले होते. तरीदेखील रझाकारांनी काजळा गावात प्रवेश करून जाळपोळ, लुटालूट केली होती. दत्तोबांच्या नेतृत्वाखाली क्रांतीकारकांनी गनिमी काव्याने रझाकारांचा प्रतिकार केला. यादवराव पैलवान यांनी गंजीचा आश्रय घेतला. रझाकारांवर बंदुकीने मारा केला. त्यात अनेक रझाकार मारले गेले. परंतु रझाकारांनी प्रतिहल्‍ला केला. रझाकारांच्या या हल्‍ल्यात सिताराम कासार (सारोळा), दत्तू शितोळे,

किसन शिंदे, आप्पा शिंदे, गुलाब भोसले, रामचंद्र गोसावी, तुळशीराम मारवाडी या सैनिकांना वीरमरण आले. काजळा कॅम्पला दत्तोबांचे कणखर नेतृत्व लाभले होते. काजळा गावापासून २ मैल अंतरावर काळेवाडी नावाचे गाव होते. तेथेही अत्याचार करण्याचे रझाकारांनी ठरविले होते. ही बातमी दत्तोबांना बातमीदारामार्फत कळली. तेव्हा त्यांनी गावाच्या चौफेर आपल्या सैनिकांचे जाळे पसरविले. ते गाव अत्याचारमुक्त केले. त्यात दोन रझाकार ठार झाले. अशा प्रकारे दत्तोबांच्या नेतृत्वाखाली काजळा परिसरातील अनेक गावे अत्याचारमुक्तझाली.

## सेलू हप्त्याची लूटः

दत्तोबांनी ५ जानेवारी १९४८ रोजी औसा तालुक्यातील सेलूचा हप्ता लुटला होता. निझामाच्या गोदामाकडे जाणारा शेतसारा लुटून तो आपल्या कँपकडे पाठविण्याचे काम त्यावेळी त्यांनी केले होते. हा हप्ता लुटल्यामुळे दत्तोबांसह त्यांच्या इतर साथीदारानांही त्यावेळी अटक झाली होती. दोन दिवसावर येळा अमावस्याचा सण आला होता. त्यावेळी भातांगळी व आजूबाजूच्या परिसरातील दहा-पंधरा खेड्यांनी हा सण साजरा केला नाही. पुढे १३ जानेवारी १९४८ रोजी दत्तोबा व त्यांचे सहकारी सुटले. तेव्हा त्या भागातील लोकांनी १४ जानेवारी संक्रांतीच्या दिवशी 'येळवस' हा सण आनंदाने साजरा केला. आजही त्या गावांची 'येळाअमावस्या' १४ जानेवारी संक्रातीच्या दिवशीच साजरीकेलीजाते.

## आळणी गावाला गुप्तपणे संरक्षण:

निझाम सरहद्दीवरील आळणी गावाला दत्तोबांनी गुप्तपणे संरक्षण दिले होते. ब्रिटीश राजवटीतील व नंतर भारत सरकारच्या हद्दीतील काजळे, जवळे दुमाला व चिंचोली या बार्शी तालुक्यातील गावांमध्ये दत्तोबांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्त्यांची शिबिरे चालविली जात. काजळे व जवळे दुमाला शिबीराचे दत्तोबा हे दुवा होते. तसेच ते संघनायकही होते. त्यामुळे त्यांचा व आजूबाजूच्या खेड्यातील गावरक्षक संघटनेचे प्रमुख, पुढारी, मुखिया यांचे संबंध येत होते. त्याचप्रमाणे आळणी गावची संघटना, जनता यांच्याशीही दत्तोबांचे संबंध येत होते. त्यावेळी दत्तोबांनी आळणी गावालाही गुप्तपणे संरक्षण दिले होते.

## नाईचाकूर पोलीसस्टेशनवर छापा:

१६ जानेवारी १९४८ ला दत्तोबांच्या नेतृत्वाखाली 'नाईचाकूर पोलीसस्टेशनवर स्वातंत्र्य सैनिकांनी हल्ला केला होता. या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार हा दत्तोबा भोसले मातोळकर व त्याची पार्टी आहे.' अमा कयास खुद्द कलेक्टर महंमद हैदर याने लावला होता. त्यानंतर त्याने आपल्या 'ऑक्टोबर कुप' या स्वतःच्या आत्मचरित्रात या गोष्टीचा खुलासाही केलेला आहे. दत्तोबांविषयी बोलतांना तो म्हणतो, "One member of the Kisan Mazdoor Group, Dattoba Bhonsle, had become a regular menace in areas adjoining Kajla, Tadoba, and even inareas far into the interior. He was responsible for looting the army and Sasora Levy, and making off with Rs. 7,500, the total revenue collected from Sailu. Taluka Lohara. This

took place near Ausa. He organized a successful attack on the treasury at Lohara too, from which government money was taken. It was his party that raided the Chakur police station in Umerga and relieved it of all the confiscated arms of the Umerga area. His daring day-and-night raids, made with the criminal's almost psychic ability to avoid armed border villagers, made him famous. He came to be known as 'Mathula Devil on horseback.

## किल्लारी भागात चळवळीला गती दिली:

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील किल्लारी परिसरात दत्तोबांनी हैद्राबाद मुक्तीसंग्रामाची चळवळ चांगलीच गतिमान केली होती. त्यामुळे निझामाविरुद्ध असंतोष पेटत चालला होता. गावोगावी उठाव होऊ लागले होते. माणसे पेटून उठत होती. गावोगाव प्रभातफेऱ्या काढणे, वंदे मातरम् म्हणणे, तिरंगा ध्वज फडकविणे असे कार्यक्रम सुरू झाले होते. दत्तोबा भूमिगत राहून जरी कार्य करत होते. तरी रात्रीच्या वेळी जमावात ते बोलायला उभे राहीले की, निझामावर तुटून पडत. त्यामुळे त्यांच्या साथीदारांच्या व लोकांच्याही मनात स्फुरण चढत असे.

## खर्डा, ईट, घाटपिंपटी परिसरात स्वातंत्र्य लढा पेटविला:

उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम तालुक्यातील ईट हे एक प्रसिद्ध गाव. येथे एकदा दत्तोबांनी क्रांतीसिंह नाना पाटलांची सभा घेण्याचे ठरविले होते. परंतु त्या सभेला सरकारी पटवानगी मिळाली नव्हती. त्यामुळे येथे सभा घेण्यात आली नव्हती. पुढे दत्तोबांनी या भागातील लोकांना एकत्र करून स्वातंत्र्य लढ्यासाठी

प्रेरणा दिली. ईटबरोबरच खर्डा, आद्रुड, घाटपिंपरी, ईजोरा, गिरवली, डोकेवाडी या गावांनीही मोठा सहभाग घेतला. या लोकांना दत्तोबांनी मोठी साथ दिली.

## काटी परिसरात निझामविरोधी कृतीदले आक्रमक केली:

दत्तोबांनी हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या माध्यमातून निझामाविरोधी उठाव सुरू केले होते. काटी गावचे माले पाटील गणपतराव देशमुख यांना प्रत्यक्षपणे चळवळीत भाग घेता येत नव्हता. त्यावेळी ते गौडगाव, पानगाव या ठिकाणच्या कॅम्पबरोबर संपर्क करत. त्यावेळी दत्तोबांच्या व त्यांच्या भेटीगाठी होत. तेही दत्तोबांना अप्रत्यक्षपणे मदत करत. दत्तोबांनी निझाम सरकारविरुद्ध रणशिंग फुंकले होते. उस्मानाबाद सीमेवरून निझामविरोधी कृतीदले त्यांनी आक्रमक केली होती. सरकारविरोधी कारवाईसाठी स्वातंत्र्यसैनिकांना सज्ज केले होते. दत्तोबांनी गुप्तपणे आपल्या हालचाली चालू केल्या होत्या. सोलापूर जिल्ह्याच्या परिसरात राहून हैद्राबाद मुक्तीसंग्रामाची चळवळ चालविण्याकरिता ते जिवाचे रान करत होते.

## देवताळ्यात दीडशे रझाकारांचा खात्मा:

देवताळा येथे साधारणतः जून ते सप्टेंबर १९४८ च्या दरम्यान दत्तोबांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यसैनिकांनी तब्बळ दीडशे रझाकारांचा खात्मा केला होता. त्यावेळी दत्तोबांनी मुस्लिम महिलांना सुरक्षित ठिकाणी नेऊन त्यांचे प्राण वाचविले होते. ज्यावेळी सशस्त्र उठाव झाला होता त्यावेळी सर्वत्र एकच हाहाकार उडाला होता. लोक सैरावैरा पळत सुटले होते. रक्ताचा सडा व प्रेतांचा खच पडला होता. रझाकारांचा म्होरक्या ौरुद्दीन वकील व नंतर त्याचा भाऊ सनाउल्ला यांना ठार मारले होते. रझाकारांचा खात्मा केल्यानंतर जमावाने

रझाकारांना आश्रय देणाऱ्या नांदुर्व्याच्या देशमुखांचे घा उद्ध्वस्त केले होते. हा सर्व थरार म्हणजे दत्तोबांच्या गनिमी युद्धाचाच एक प्रकार होता.

## अखेर निझामाचा बिमोड झाला:

दत्तोबांच्या कथा जात्याच्या पाळूपासून ते चावडी-चावडीपर्यंत सांगितल्या जातात. त्यांना पकडण्यासाठी निझामाने लाखोंचे बक्षिस ठेवले होते. अनेक सापळे रचले गेले पण ते सापडले नाहीत. वेशांतर करण्यापासून ते पांढऱ्या घोडीवर वाऱ्यासारखे धावणारे, सशस्त्र तरुणांची फौज उभी करणारे दत्तोबा भोसले एक अख्यायिका बनले आहेत. त्यांच्या या लढ्याला शिक्षणाची किनार आहे. ओठावर क्रांतीचा जयजयकार, त्यांच्या आवाजातली जरब अन् डोळ्यातल्या तेजाने रझाकार थरथरा कापत असत. तलवारबाजी, दांडपट्टा, घोडेस्वारी याचे शिक्षण त्यांनी चिंचोली- बार्शी भागातल्या कॅम्पवर तरुणांना दिले. शेकडो रझाकार कापून काढले. रझाकार आरणी, डिक्सर या गावची ज्वारी घेऊन जात असताना दत्तोबा भोसले यांनी ५०० पोते ज्वारी लुटली व कॅम्पमधील लोकांना दिली. तरुणांच्या पलटणी निर्माण करून त्यांना प्रशिक्षण दिले. एका पलटणीत चारशे ते पाचशे तरुण असत. अनेक कॅम्प उभे केले. मोरारजी देसाई; यशवंतराव चव्हाण यांनी उपळ्याला भेट देऊन तेथील दत्तोबा भोसले यांचे कार्य पाहून गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना अहवाल दिला. त्यानंतर गृहमंत्र्यांनी सैन्य पाठवले. अवघ्या साडेचार दिवसातच निझामाचा बिमोड होऊन हैद्राबाद संस्थान १७ सप्टेंबर १९४८ ला भारतात विलीन झाले.

**कौटुंबिक:**

जेलमधून सुटल्यानंतर उस्मानाबादजवळील जवळे (दुमाला) येथील सुभद्रा - आई व भागुराम वडगणे यांची कन्या यमुनाबाई यांच्याशी दत्तोबांचा २५ मे१९५१ रोजी कनगरा (ता.जि. उस्मानाबाद) येथे विवाह झाला. दत्तोबांना विवेकानंद, अरविंद, सच्चितानंद, अच्युतानंद, तन्मयानंद ही पाच मुले व निर्मला, कादंबरी, कुमुदिनी, तनुजा या चार मुली झाल्या. दत्तोबांनी आपल्या पहिल्या मुलीच्या जन्माचे स्वागत केले होते. स्त्री-पुरुष समानता त्यांना अपेक्षित होती. अशा ह्या वीर योद्ध्याला विनम्र अभिवादन !

# प्रकरण चौथे:

# दत्तोबा भोसले यांचे कारागृहातील डायरीतील प्रगल्भ व पुरोगामी विचार

## दत्तोबांचे सामाजिक व राजकीय विचार:

दत्तोबा भोसले यांना डायरी लिहिण्याचा छंद होता. वाचन, मनन, चिंतनात रमणारा हा नायक तितकाच संवेदनशील अन् कुटुंबवत्सलही होता. आईवर त्यांचे प्रचंड प्रेम होते. तलवार आणि लेखणी दोन्ही राष्ट्रभक्तीतून निर्माण झाले होते. कारागृहात त्यांनी लिहिलेल्या रोजनिशीतले लेख त्यांच्या राष्ट्रवादाचे, देशभक्तीचे अन् गुलामगिरीविरुद्ध, विषमतेविरुद्ध त्यांचा कल स्पष्ट करणारे आहेत. "ज्यावेळी माणूस कोशिश करून करून थकतो तेव्हा त्याचा प्रयत्न दत्तोबा भोसले यांच्या १९४९ ते १९५२ काळातील डायरीतले प्रगल्भ व पुरोगामी विचार सफल होणार हे खास. अत्यंत उन्हाळ्यानंतर पावसाळा येतो, अत्यंत हिवाळा होऊ लागला की उन्हाळा जवळ आहे असे समजावे. "अमावस्येच्या दिवशी काळ्याकुट्ट अंधारातच विजेची कोर दिसते."

"जगातील श्रमणाऱ्या किसान कामगाराची भूक शांत होईल तेव्हाच जगात शांतता निर्माण होईल." गुलामगिरीच्या तूप साखरेपेक्षा स्वातंत्र्याची मीठभाकरच राष्ट्राची उन्नती करू शकेल. "देवभक्ती हा एका दुबळ्या मनाचा दुःख विसरण्याचा मार्ग आहे. पण कुठलीही दुःखे विसरुन दूर होत नाहीत. ती झगडून प्रसंगी लढून दूर करावी लागतात. तशातलाच समाजसेवेचा प्रकार असतो. स्वतःला, आपल्यावर प्रेम करणाऱ्यांना सर्वस्वालाच मूठमाती द्यावी लागते, पारखे व्हावे लागते. "मोठमोठे वृक्ष क्षणात उगवत नाहीत. क्षणात उगवणारी झाडे क्षणात मरतात. भराभरा जन्मणारे जिवजंतू मरतातही भराभरा. मोठी ध्येये, मोठे विचार वाढीला लागावयाला वेळच लागणार. सृष्टीचा हा नियम आहे. तो लक्षात ठेवून वागले पाहिजे. "लोककल्याणाचा एकच राजमार्ग म्हणून दाखविण्याइतके हिंदुस्थानचे भावी सौख्य आज एकदेशीय नाही. एकीकडे

राजकीय, सामाजिक सुधारणा आहेत. धर्म, उद्योग, शिक्षण आहे. स्त्रियांचा प्रश्न आहे. तसेच अस्पृश्यांचाही प्रश्न आहे व जातीभेदाचाही गोंधळ आहे. अशा या चमत्कारिक परिस्थितीत अमुक एकच मार्ग इतरांपेक्षा चांगला आहे, असे सांगणे मोठे धाडसाचे आहे. परिस्थितीच्या अनुभवाप्रमाणे या विषयावर ज्याचे त्याचे विचार अगदी निरनिराळे झालेले आहेत. व्यक्ती तितक्या प्रकृती, प्रकृती तितकी मतं आणि मतं तितके मार्ग असा प्रकार होऊन आज जबाबदार आणि बेजबाबदार अशा सर्वच लोकांना बारा वाटा मोकळ्या होऊन बसल्या आहेत. आपल्याहून भिन्न रीतीने लोकहिताचा प्रयत्न कोणी करीत असेल तर त्याच्याबद्दल सहानुभूती न दाखविणे, देशहिताच्या विचारतच स्पर्धा वाढवून एकमेकांना खाली पाडणे, दुसऱ्याच्या प्रयत्नाबद्दल अनादर दाखविणे या कारणांमुळे आज देशाची इतकी अवनती होत आहे. तितकी दुसऱ्या कुठल्याही कारणामुळे होत नसेल."

# प्रकरण पाचवे:

# उपसंहार

हैदराबाद संस्थान दक्षिण भारतातील सर्वात मोठे व भारताच्या मध्यभागी असलेले संस्थान होते. या सस्थानावर इ.स. 1724 ते इ.स. 1948 या काळात आसफजाही घराण्याची निजाम राजवट होती. ही निजाम राजवट शेवटी एक राजसत्ता होती लोककल्याण है या राजसतेचे उिद्दष्टच नव्हते. सत्ताकांक्षा हाच या राजसतेचा पाया होता. त्यामुळे सतेचा अनियत्रितपणा, लहरी कारभार व जनकल्याणरहित धोरण अशा दोषपूर्ण प्रक्रिया संस्थानात वाढत गेल्या होत्या. अशा निजाम राज्यकर्त्यांनी स्वहितापुढे संस्थानातील प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे जनतेने एकत्र येऊन जो लढा दिला तो लढा म्हणजेच हैद्राबाद मुक्तीलढा होय.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये प्रकरण अभ्यास पद्धती म्हणजेच प्रकल्प उिद्दष्टे, प्रकल्प अभ्यासाची गरज, प्रकल्प अभ्यासाची व्याप्ती, प्रकल्प अभ्यासाचे महत्त्व, तसेच मराठवाड्याचा इतिहास याबद्दल माहिती दिली आहे. तसेच क्रांतिवीर दत्तोबा भोसले यांच्या इतिहासाची ओळख करून देण्यात आली आहे.

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात दत्तोबा भोसले यांचा जन्म, बालपण ,प्राथमिक शिक्षण, व स्वतःला हैद्राबाद मुक्तिसंग्राम लढ्यात कसे झोकुन दिले. याचे सविस्तर ओळख करून देण्यात आली आहे . निजामाने सर्वसामान्य जनतेवर केलेल्या अत्याचार याचेही विश्लेषण यात करण्यात आलेले आहे. व या विषयाची उपयुक्तता या प्रस्तुत प्रकरणात मांडण्यात येणार आहे.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यात दत्तोबा भोसले यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडलेल्या अनेक घटना आणि त्यातून त्यांना रॉबिन हूड अशी पदवी देण्यात आली होती यांचा सविस्तर आढावा आपण या प्रकरणात घेणार आहोत.

हैद्राबाद मुक्ती लढ्यासाठी शेकडो युवा क्रांतिकारानी गावोगावी लढे उभारले आणि आयाबहिणींचे रक्षण केले. असे क्रांतिकारक कधीच प्रसिद्धीच्या झोतात आले नाहीत. निझाम आणि रझाकारांच्या छळाने रयत त्रस्त होती. रझाकार आले असे नुसते ऐकले तरी, लोक भीतीने कापायचे. असे असले तरी,

एका तरुण क्रांतीकारकाची ख्याती अशी होती की, त्याच्या केवळ नावाने रझाकार थर थर कापायचे. त्या धाडसी क्रांतिकारकाचे नाव होते-दत्तोबा भोसले मातोळकर. हातात तलवार, पाठीवर बंदूक लटकवून पांढऱ्या शुभ्र घोड्यावर स्वार झालेले दत्तोबा भोसले म्हणजे अत्याचारी रझाकार आणि निजामाचे कर्दनकाळ होते.

हैदराबाद संस्थानात ८५ टक्के हिंदू, दहा टक्के मुसलमान आणि पाच टक्के इतर समुदायाची प्रजा होती. असे असले तरी, ८५ टक्के सरकारी नोकऱ्या मुस्लिमांना आरक्षित होत्या. हैदराबाद संस्थानांमध्ये मराठवाड्याचे पाच, कर्नाटकाचे तीन आणि तेलंगणाचे आठ जिल्हे समाविष्ट होते. प्रशासनाची भाषा उर्दू होती. इतर भाषा दुर्लक्षित होत्या. इंग्रजांनी आपल्या देशावर प्राधान्याने आर्थिक गुलामगिरी लादली आणि आर्थिक शोषण केले, मात्र निजामाने केवळ राजकीयच नव्हे तर, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक गुलामगिरी केली. व सर्व सामान्य माणसाची पिळवणूक केली.

दत्तोबा भोसले यांचे स्मारक उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाने तब्बल 1.5 कोटी एवढा निधी मंजूर केला आहे.

दत्तोबा भोसले यांचे मला त्यांच्या व्यक्तिमत्वाची आवड लहानपणापासून त्यांच्याबद्दल त्यांनी केलेल्या कार्याबद्दल आकर्षण वाटत होते, म्हणून मी हा विषय शोध प्रबंधासाठी निवडला आहे. मातोळा हे गाव माझ्या गावापासून अगदी जवळच आहे त्यामुळे त्यांच्या कार्याची माहिती इतरत्र व्हावे अशी माझी इच्छा होती.

## निष्कर्षः

1. मराठवाडा मुक्तीसंग्राम विषयीचा इतिहास आजच्या पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करणे.

2. मराठवाडा मुक्तिसंग्राम हा मराठवाड्यातीलच नव्हे तर राष्ट्राभिमानी अशा प्रत्येकासाठी प्रेरणा देणारा लढा आहे.

3. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत असताना स्मृतीग्रंथाच्या रुपाने मराठवाड्यात लढल्या गेलेल्या मुक्तिसंग्रामाचा इतिहास शब्दबद्ध करण्यात आला आहे. हा इतिहास एक महत्वपूर्ण ऐतिहासिक दस्तावेज ठरणार आहे.

4. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा लढा हा स्वातंत्र्याचे नवे मूल्य सिद्ध करणारा उरला आहे.

5. मराठवाडा मुक्तीसंग्राम हा मराठवाड्याच्या बरोबरीने तेलंगणा, कर्नाटकच्या जनतेला मुक्त करण्यासाठीचा लढा होता. देशाच्या उरलेल्या स्वातंत्र्यासाठीचा, तो दूसरा लढा होता. मराठवाडा मुक्तीसंग्राम हा मराठवाडयातल्या जनतेचा लढा होता, तो जनतेने लढला.

6. मराठवाडयाची भूमी ही संतांची, महंतांची, सूरांची, बोरांची, मुडोवतांची, कर्तृत्ववान सुपुत्रांनी भूमी आहे, मराठवाडयाची भूमी, ज्ञानवंतांची, प्रज्ञावंतांची बुद्धीवंतांची, कलावंतांची, कष्टकाऱ्यांची भूमी आहे. या भूमीला धैर्याचा, शौर्याचा, संघर्षाचा वारसा आहे.

7. देशाला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तब्बल 13 महिने 2 दिवसांनी, म्हणजे, 17 सप्टेंबर 1947 रोजी मराठवाड्याला स्वातंय मिळाले, त्यासाठी सर्वसामान्य जनतेला निजामाच्या सैन्याशी लढावे लागले. गावागावात आंदोलन करावे लागले. रस्त्यावर उतरुना सशस्त्र लढा द्यावा लागला. रक्त सांडावे लागले. त्याग करावा लागला, त्या त्यागाचे कायम स्मरण करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

8. स्वामी रामानंद तीर्थ यांनी या मुक्तीसंग्रामाचे नेतृत्व केले. सन्माननीय दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई ऑफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशांपायन, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे यांच्यासारख्या नेत्यांनी त्यांना भक्कम साथ दिली. मराठवाडा मुक्तीचा लढा हा लोकांनी त्यांच्या गावागावात लढवला, हे या लक्ष्याचे वैशिष्ट्य आहे. या सर्वांच्या त्याग, पराक्रमातून मराठवाडा स्वतंत्र झाला. या सर्वाच्या त्यागाचे स्मरण करून, या स्वातंत्र्यसैनिकांबद्दल कायम कृतज्ञ राहणे हे आपले कर्तव्य आहे.

9. मक्तीसंग्राम हा मराठवाड्याचा गौरवशाली इतिहास आहे. मराठवाडयातील जनतेच्या शौर्याचा, त्यागाचा, पराक्रमाचा, संघर्षांचा, अस्मितेचा इतिहास आहे.

## संदर्भग्रंथसूची :


1) स्मृतीग्रंथ  : मराठवाडा मुक्तीगाथा, लातूर.

2)  अनंत भालेराव : "हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा ",मौज प्रकाशन , मुंबई,1987

3) डॉ.अनिल कठारे:  आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास

4)  श्री.विवेक भोसले : क्रांतिवीर दत्तोबा भोसले ( मातोळकर)

5) वैभवशाली मराठवाडा, अमृत महोत्सवी विशेषांक 2023

6) डॉ.चद्रकांत लोखंडे: हैद्राबाद मुक्तीसंग्राम का इतिहास

7) आबासाहेब वाघमारे: हैद्राबाद मुक्तीसंग्रामदिन

8) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, औरंगाबाद जिल्हा, महाराष्ट्र शासन, मुंबई 1967

9) कुलकर्णी श्रीधर ( संपा) , "हैद्राबाद राज्याचे विसर्जन "साकेत, प्रकाशन पुणे ,1986

10) महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर, परभणी जिल्हा, महाराष्ट्र शासन, मुंबई 1967

11) https://mr.m.wikipedia.org/wiki.com

12) https://vskbharat.com/hyderabad-liberation-hyderabad-resistance-form-of-nizams-state

13) https://vishwakosh.marathi.gov.in/20186/

14)https://translate.google.com

15) महाराष्ट्र शासन - दत्तोबा भोसले मातोळकर, हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील रॉबीनहूड, सांस्कृतीक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन, सांस्कृतिक कार्य विभाग, पृ. क्र. 7 व 8.

16) डॉ. कदम सतीश - हैद्राबाद मुक्तिसंग्रामात असे झुंजलो आम्ही, क्लास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2014, पृ.क्र. 50-51. क्रांतीवीर दत्तोबा भोसले मातोळकर, लेख द कॉन्ट्रीब्युशन औष

17)लेंगे संतोष - आसीम शौर्याची धगधगती मशाल मराठवाडा इन हैदराबाद, फ्रिडम स्ट्रगल मुव्हमेंट, अरुणा प्रकाशन, लातूर, 2023, पृ. 97-98.


18) मोहंमद हैदर - ऑक्टोबर कूप, रोली बुक्स, न्यू दिल्ली, 1948.

19)श्री. भोसले विवेक - क्रांतीवीर दत्तोबा भोसले (मातोळकर), स्पॅन पब्लिकेशन, औरंगाबाद, तृतीय (सुधारीत) आवृती पृ. 58.


20)प्रा. जाधव अर्जुन व चव्हाण विजय क्रांतीवीर : दत्तोबा भोसले, मुक्तरंग प्रकाशन, लातूर - 2012.

21)पवार संदिपान - वैभवशाली मराठवाडा 2023, मराठवाडा मुक्तिसंग्राम इतिहास, अमृत महोत्सवी विशेषांक, लेख संतोषकुमार लेंगे, मराठवाडा समन्वय समिती, पुणे, पृ. क्र. 75

# छायाचित्रे:



क्रांतीवीर दत्तोबा भोसले यांचे चित्र
महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या राजदरबारातील
राजचित्रकार एम. डी. घोरपडे यांनी 4.4.1942 रोजी
रेखाटलेले असून चित्रावर त्यांची स्वाक्षरी पहावयास मिळते.



असीम शौर्याची धगधगती मशाल, मराठवाडा मुक्तीलढ्याचे सेनानी
**क्रांतीवीर दत्तोबा भोसले**
जन्म दि. १९ नोव्हेंबर १९१८ मृत्यु. ०२ जानेवारी १९७४




राजरत्न प्रोफेसर माणिकराव यांच्या समवेत आखाड्यातील विद्यार्थी
मधल्या रांगेत बसलेल्या विद्यार्थ्यांमधे डावीकडून चौथे श्री. दत्तोबा भोसले



Champions at the Inter Collegiate Sports



राजाराम अनंत पाटील   दत्तोबा भोसले   सी. एल. बरोट

The College Wrestling Team



डावीकडून श्री. दत्तोबा भोसले, श्री. देशमुख र. अ., श्री. पाटील र. द.
अखील भारतिय कुस्ती स्पर्धा, बडोदा कॉलेज - 25 जानेवारी 1939

दत्तोबा यांच्या लग्नप्रसंगी मध्यभागी मातोश्री कै. लक्ष्मीबाई भोसले





सत्यमेव जयते





महाराष्ट्र शासन

सन्मान पत्र


श्री. दत्तात्रय ईश्वरराव भोसले यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामांत केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यांत येत आहे.


सचिवालय
मुंबई 32
दिनांक [illegible]


मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य


**कै. दत्तोबा यांच्या हस्तलिखित डायरीतील काही मजकूर**




**अंधश्रद्धेवर दत्तोबा यांचे मत डायरीच्या पानातून**



॥ मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धि ॥

166 SATURDAY 14th JUNE 1952 200

जून ता. १४ शनिवार, ज्येष्ठ कृष्ण ७ शके १८७४

જુન તા. ૧૪ શનિવાર, જેઠ વદ ૭ સં. ૨૦૦૮

१६ दय १३२१ (२० रमजान १३७१) १४ अमरदाद १३६१

काला८,मिथुनेर्कः,र.उ. ६-२२.अ.७-२४,चं घ.४७नंमीन,शततारका

॥ प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी ॥


167 SUNDAY 15th JUNE 1952 199

जून ता. १५ रविवार, ज्येष्ठ कृष्ण ८ शके १८७४

જુન તા. ૧૫ રવિવાર, જેઠ વદ ૮ સં. ૨૦૦૮

१७ दय १३२१ (२१ रमजान १३७१) १५ अमर. १३६१

र. उ. ६-२ र. अ. ७-२४ चंद्र–मीन, पूर्वाभाद्रपदा



॥ जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४३ ॥

174 SUNDAY 22nd JUNE 1952 192

जून ता. २२ रविवार, ज्येष्ठ कृष्ण ३० शके १८७४

જુન તા. ૨૨ રવિવાર, જેઠ વદ ૩૦ સં. ૨૦૦૮

२४ दय १३२१ (२८ रमजान १३७१) २२ अमरदाद १३६१

र. उ. ६-४ र. अ. ७-१६, चंद्र–मिथुन, मृगशीर्ष

॥ मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ॥

175 MONDAY 23rd JUNE 1952 191

जून ता. २३ सोमवार, आषाढ शुक्ल १ शके १८७४

જુન તા. ૨૩ સોમવાર, આષાઢ શુદ ૧ સં. ૨૦૦૮

२५ दय १३२१ (२९ रमजान १३७१) २३ अमरदाद १३६१

वासुदेवा. पु. ति., र. उ. ६-४ र. अ. ७-१६ चंद्र–मिथुन, आर्द्रा

**सत्यनारायण पोथी अशा अनिष्ट प्रथेवर दत्तोबा यांचे परखड मत डायरीच्या पानातून**

अ‍ॅड. हिराजी गायकवाड

# हैदराबाद मुक्तिसंग्रामातील रॉबिनहूड

**हैदराबाद संस्थानांमध्ये स्वातंत्र्याच्या कार्यासाठी १९३८ मध्ये स्वामीजी, श्रॉफ, परांजपे, पी. व्ही. नरसिंह राव यांनी स्टेट काँग्रेसची स्थापना केली. स्वामी रामानंद तीर्थ यांनी शेकडो देशभक्त घडवले. दत्तोबा भोसले त्यातील एक. त्यांना रझाकारही थरथर कापायचे. आजच्या हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त...**



निमित्त

हैदराबाद मुक्ती लढ्यासाठी शेकडो युवा क्रांतिकारकांनी गावोगावी लढे उभारले आणि आयाबहिणींचे रक्षण केले. असे क्रांतिकारक कधीच प्रसिद्धीच्या झोतात आले नाहीत. निझाम आणि रझाकारांच्या छळाने रयत त्रस्त होती. रझाकार आले असे नुसते ऐकले तरी, लोक भीतीने कापायचे. असे असले तरी, एका तरुण क्रांतीकारकाची ख्याती अशी होती की, त्याच्या केवळ नावाने रझाकार थर थर कापायचे. त्या धाडसी क्रांतिकारकाचे नाव होते-दत्तोबा भोसले मातोळकर. हातात तलवार, पाठीवर बंदूक लटकवून पांढऱ्या शुभ्र घोड्यावर स्वार झालेले दत्तोबा भोसले म्हणजे अत्याचारी रझाकार आणि निजामाचे कर्दनकाळ होते.

हैदराबाद संस्थानात ८५ टक्के हिंदू, दहा टक्के मुसलमान आणि पाच टक्के इतर समुदायाची प्रजा होती. असे असले तरी, ८५ टक्के सरकारी नोकऱ्या मुस्लिमांना आरक्षित होत्या. हैदराबाद संस्थानांमध्ये मराठवाड्याचे पाच, कर्नाटकाचे तीन आणि तेलंगणाचे आठ जिल्हे समाविष्ट होते. प्रशासनाची भाषा उर्दू होती. इतर भाषा दुर्लक्षित होत्या. इंग्रजांनी आपल्या देशावर प्राधान्याने आर्थिक गुलामगिरी लादली आणि आर्थिक शोषण केले, मात्र निजामाने केवळ राजकीयच नव्हे तर, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक गुलामगिरी ...

... हात लावला नव्हता. आर्य समाजाने या अन्यायाचा विरोध करण्यासाठी [illegible] मध्ये मोठी चळवळ सुरू केली. त्यांनी सुरुवातीला सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिला. राष्ट्रीय काँग्रेसचे कार्य सुद्धा मोठे होते. जंगल सत्याग्रह उल्लेखनीय होते. हैदराबाद संस्थानांमध्ये स्वातंत्र्याच्या कार्यासाठी १९३८ मध्ये स्वामीजी, श्रॉफ, परांजपे, पी. व्ही. नरसिंह राव यांनी स्टेट काँग्रेसची स्थापना केली. स्टेट काँग्रेसचा लढा पुढे एक दशक चालू होता. हैदराबाद मुक्तिलढ्यात स्टेट काँग्रेस प्राधान्याने सहभागी होती. सुरुवातीला संस्थानने स्टेट काँग्रेसवर बंदी घातली, तरीही ...

... स्टेट काँग्रेस घेत होती. स्टेट काँग्रेसने गावोगावी लष्करी छावण्या उघडल्या होत्या. अनंतराव भालेराव यांनी उमरी बँकेवर सशस्त्र दरोडा टाकून लाखो रुपये लुटले, त्याचा हिशोब सरदार पटेल यांना दिला.

रझाकार या संघटनेतील लोकांनी अनेक गावे जाळून भस्मसात केली. महिलांची अब्रू लुटणे, जाळपोळ करणे, खून, बलात्कार, लूट आणि धर्मांतर अशा अनेक गोष्टीत ही संघटना सक्रिय होती. याच काळात तुळजापूर तालुक्यातील हिप्परगा येथे राष्ट्रीय विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ कार्यरत होते. ही शाळा म्हणजे देशभक्त निर्माण करणारी फॅक्टरी होती. स्वामी रामानंद तीर्थ यांनी शेकडो देशभक्त घडवले. चंद्रशेखर बाजपेयी, [illegible] घडवले. यातील दत्तोबा भोसले यांनी पुढच्या शिक्षणासाठी बडोदा गाठले. तेथे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी चालवलेल्या शाळांमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. महाराजांनी त्यांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या तालमीत ठेवले. स्वतः महाराजांनी त्यांच्याशी कुस्ती खेळली. महाराजांच्या तालमीत वाढलेले दत्तोजी भोसले, गुलामगिरीतून मातृभूमीची मुक्ती करण्यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यात आले. मातोळा हे त्यांचे मूळ गाव मात्र त्यांची कर्मभूमी ही पूर्वाश्रमीचा उस्मानाबाद जिल्हा, बार्शीपासून लातूरपर्यंत त्यांचे सैन्य विखुरले होते. अनेक ठिकाणी मुक्तिलढ्यासाठी त्यांनी कॅम्प उभारले. उस्मानाबाद बार्शी या तालुक्यांच्या सीमारेषेवर चिंचोली कॅम्प होता. या कॅम्पवरील स्वातंत्र्यसैनिकांनी निजामाच्या हद्दीतील ६५ गावे मुक्त करून मुक्तापूर घोषित केली. दत्तोबा भोसले यांनी या कार्यात पुढाकार घेतला होता. जवळे येथे चिंचोली कॅंपचा उपकॅंप उघडण्याचे कार्यही त्यांनी केले. शिवाय काजळा येथेही कॅम्प उघडला. ते घोडेस्वारी, दांडपट्टा, तलवारबाजी आणि बंदुका चालविण्याचे प्रशिक्षण तरुणांना द्यायचे. त्यांच्या केवळ नावाने रझाकार थरथर कापायचे. कलेक्टर हैदरी यांनी त्यांना पकडण्यासाठी मोठे बक्षीस ठेवले. हे समजल्यावर दत्तोबा यांनी सरळ त्यांचीच गाडी अडवून त्यावर बॉम्ब फेकले.

दत्तोबा भोसले अग्रेसर होते असे नव्हे तर, त्यांच्या कार्याला आणि विचाराला तत्वज्ञानाचे अधिष्ठान लाभले होते. त्यांचे वाचन प्रचंड होते. काही काळ त्यांनी क्रांतिसिंह नानापाटील यांच्या कॅम्पमध्ये राहून क्रांतिकार्य बारकाईने अभ्यासले होते. काजळा आणि चिंचोली कॅम्पवरील सशस्त्र हल्ले त्यांनी परतावून निजामाला धूळ चारली होती. सेलू हप्त्याची लूट करून त्यांनी निजामाचा खजिना लुटला. रझाकार भातागळी या गावात ठाण मांडून होते. लोकांना प्रचंड त्रास देत होते. दत्तोबा भोसले गावच्या दिशेने येत आहेत हे नुसते ऐकून रझाकारांनी गाव सोडून पळ काढला. नंदुर्गा येथे देशमुखांच्या वाड्यात दीडशे रझाकार आणि त्यांचे नेते थांबले होते. दत्तोबा भोसले यांनी हल्ला करून त्यांना शरण ...

---

**मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन विशेष** • असामान्य शौर्य, अद्वितीय धैर्य अन् अथक संघर्षाची कहाणी

# 'रझाकारांचा कर्दनकाळ' ठरलेल्या क्रांतिवीर दत्तोबा भोसलेंनी निजामाच्या तावडीतून मुक्त केली होती तब्बल २७४ गावे

विजय बुवा | औरंगाबाद

मराठवाडा मुक्तिसंग्रामात मोठे योगदान देऊनही अनेक योद्धे, स्वातंत्र्यसेनानी अपरिचित, उपेक्षित राहिले. क्रांतिवीर दत्तोबा भोसले (मातोळकर) हे त्यापैकीच एक. त्या लढ्यात शौर्य आणि धैर्यासोबत आक्रमक नेतृत्वाचे, कुशल रणनीतीचे दर्शन घडवणाऱ्या दत्तोबांनी रझाकारांना अक्षरशः धडकी भरवली होती. उस्मानाबाद, औरंगाबाद, परभणी, नांदेडसह गुलबर्गा आणि रायचूर या जिल्ह्यांतील जवळपास २७४ गावे दत्तोबा आणि त्यांच्या साथीदारांनी निजामाच्या तावडीतून मुक्त केली. त्यांच्या या असामान्य कामगिरीमुळे संपूर्ण मुक्तिसंग्रामालाच तेजाची सोनेरी किनार लाभली.



दत्तोबा भोसले

### मातोळा डेव्हिल ऑन हॉर्सबॅक... नावाचीच दहशत

मुक्तिसंग्रामाच्या काळात उस्मानाबादचे कलेक्टर महंमद हैदर यांनी या बंडावर 'ऑक्टोबर कूप' हे पुस्तक लिहिले आहे. हैदर यांनी दत्तोबांचा उल्लेख 'मातोळा डेव्हिल ऑन हॉर्सबॅक' असा केला आहे. दत्तोबांची किती दहशत होती, हे यांतून लक्षात येते. त्यांचे सहकारी भानुदास कैकाडी, केशवराव चव्हाण, कॅ. जोशी, नाना चिंचोलीकर, वसंत देशमुख, व्यंकटराव पाटील यांचीही नोंद या निमित्ताने घ्यायला हवी. दत्तोबांचे सुपुत्र विवेक भोसले यांनी हा शौर्याचा इतिहास लेखसंग्रहाच्या रूपाने जतन केला आहे.

औसा तालुक्यातील मातोळा येथे एका सामान्य शेतकरी कुटुंबात दत्तोबांचा जन्म झाला. उर्दूतून प्राथमिक शिक्षण घेतल्यावर ते हिप्परगा येथील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या राष्ट्रीय शाळेत दाखल झाले. तेथून त्यांनी पुढचे शिक्षण सोलापूरच्या हरिभाई देवकरण शाळेत घेतले. या शालेय जीवनात त्यांच्यावर शिक्षणाबरोबरच व्यायाम आणि देशभक्तीचा संस्कार झाला. महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते बडोद्याला गेले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण ओळखले आणि प्रा. गजानन ताम्हणकर तथा राजरत्न माणिकराव यांच्या वाड्यात त्यांची व्यवस्था केली. राजारामबापू पाटीलही याच महाविद्यालयात शिकत होते. पुढे बापूंनी दत्तोबांना क्रांतिसिंह नाना पाटील यांची ओळख करून दिली आणि इथेच त्यांच्या पुढच्या आयुष्याची दिशा निश्चित झाली.

क्रांतिसिंहांनी दत्तोबांमधील उत्कट राष्ट्रप्रेमाला क्रांतिकारी विचारांची जोड दिली. जुलमी राजवटीविरुद्ध बंडासाठी बॉम्ब बनवण्याच्या प्रशिक्षणासह अन्य मदतही केली. रझाकारांना नेस्तनाबूत करण्याचे ध्येय घेऊन दत्तोबा मूळ गावी परतले. उर्वरित. पान ८

---

लोकमत

दत्तोबा भोसले होते क्रांतिकारकांचे मुकुटमनी

# नडला की आडवाच केला, रझाकारांत होती दत्तोबांची दहशत

लोकमत न्यूज नेटवर्क



**उस्मानाबाद :** निझामाच्या रझाकारींनी गावागावात, मनामनात आपल्या अमानवीय अत्याचारांनी दहशत निर्माण केली होती. त्यांच्या स्वैर वर्तनाला लोक वैतागून गेले होते. मनात चीड उत्पन्न झाली होती. यातूनच मुक्तिसंग्रामच्या लढ्याची ठिणगी ठिकठिकाणी पडली होती. या ठिणगीतूनच दत्तोबा भोसले नावाची आगीची ज्वाळा तयार झाली. रझाकारींना ही पराक्रमी ज्वाळा चांगलीच पोळली. त्यामुळे अल्पकाळातच रझाकारींमध्येही दत्तोबांची दहशत निर्माण झाली होती.

स्वतंत्र भारतात सामील होण्यास नकार देणाऱ्या निझाम राजवटीतील रझाकारींनी मराठवाड्यात थैमान घातले होते. लोकांच्या कत्तली सुरू होत्या. महिलांवर अत्याचार केले जात होते. अशा परिस्थितीत बाबासाहेब परांजपे, फुलचंद गांधी, अण्णाराव पाटील, रामचंद्र पाटील, दत्तोबा भोसले, रामभाऊ जाधव, मनोहर टापरे, शिवाजीराव नाडे, नामदेवराव नाडे, राजाभाऊ कुलकर्णी, विठ्ठल गणेश साळी, भगवान तोडकरी, नरहरराव ग. मालखरे व अनेक असे शूरवीर तरुण आपल्या मायभूला मुक्त करण्यासाठी स्वतःचे बलिदान द्यायला पुढे आली.

यातीलच एक दत्तोबा भोसले हे त्यांच्या शौर्यगाथांनी स्वातंत्र्यसैनिकांचे मुकुटमनी बनले. दत्तोबा भोसले हे आताच्या लातूर जिल्ह्यातील मातोळा गावचे. एका शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या दत्तोबांना शिक्षणाची मोठी आवड. ही आवड ओळखून पालकांनी त्यांना शिक्षणासाठी उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळेत पाठविण्यात आले.

येथे स्वामी रामानंद तीर्थ व अन्य नावाजलेल्या शिक्षकांच्या तालमीतून त्यांनी शिक्षणासोबतच, कसरती तसेच देशभक्तीचे धडे गिरविले. दररोज मातोळा ते हिप्परगा असा १६ किमी पायी प्रवास करताना दत्तोबा यांच्या मनात निझामाच्या त्रासामुळे रोषाचे बीजारोपण होत गेले. त्याला राष्ट्रभक्तीच्या शिक्षणाची जोड मिळाली अन् एक क्रांतिकारक घडला. पुढे त्यांनी सशस्त्र लढ्यात स्वतःला झोकून देत अनेक ठिकाणी कॅम्प उभारले. स्वतः निझामाची लेव्ही, शस्त्रे लुटून ती स्वातंत्र्यलढ्याच्या उपयोगात आणली. अनेक रझाकारांना कायमचे आडवे करून त्यांना सळो की पळो करून सोडले. त्यांच्या शौर्यगाथा सांगताना मातोळ्यासह उमरगा, लोहारा व इतरही भागांतील नागरिकांत अजही स्फुरण चढलेले पहायला मिळते.

दत्तोबांनी जर कोणाला काखेत दाबले तर मेलाच समजा, दत्तोबा एकाच वेळी पाच-सहा जणांना आवळून ठेवू शकत होते, पुढून पन्नास माणसं जरी चाल करून आली तरी दत्तोबा एकट्याने तोंड द्यायचे धाडस राखत होते, असे कौतुकांनी भरलेले वर्णन नागरिक करतात.



शिक्षणासोबतच स्वातंत्र्यसेनानी दत्तोबा भोसले यांना कुस्तीतही चांगलाच रस होता. बडोदा येथील स्पर्धेच्या वेळचे हे छायाचित्र.

### निझामाच्या सैन्यालाच लुटले...

- निझामाचे सैनिक ससोरा लेव्ही जमा करून जात असताना सेलू येथे दत्तोबा यांनी त्यांच्यावरच हल्ला चढवीत ७ हजार ५०० रुपयांचा लेव्ही लुटून नेला. पुढे लोहारा येथील निझामाच्या खजिन्यावरही हल्ला करून येथून सरकारी पैसे लुटले. उमरग्याजवळील चाकूर पोलीस ठाण्यावर हल्ला करीत शस्त्रे पळवून नेली. दिवस असो की रात्र, धाडी व हल्ले करण्याच्या दत्तोबांच्या धाडसात वाढच होत होती. एकदा तर त्यांनी इर्ल्याच्या एका धनदांडग्या मारवाड्यास ओलीस ठेवले होते. लढ्यासाठी १ लाख रुपये देण्याची तयारी दर्शविल्यानंतर त्याला सोडण्यात आले. असा उल्लेखही कलेक्टर हैदर यांनी केलेला आहे.

**तत्कालीन कलेक्टरही झाले होते प्रभावित...**

निझामाचे तत्कालीन कलेक्टर मोहम्मद हैदर यांनी त्यांच्या ऑक्टोबर कोअप पुस्तकात ठिकठिकाणी दत्तोबा भोसले यांचे वर्णन केलेले आहे. ते म्हणतात, दत्तोबा भोसले हा प्रचंड डेअरिंगबाज व्यक्तिमत्व होते. त्यांनी नरसिंगराव वकील यांच्या पर्यवेक्षणाखाली सुरू असलेल्या अनेक कॅम्पचे नेतृत्व केले. उस्मानाबाद जेलमध्ये माझी दत्तोबांशी भेट झाली होती.

धडधाकट शरीरयष्टी कायम राखण्यासाठी ते मेहनती व्यायाम करीत असायचे. घोड्यांपेक्षाही अधिक वेगाने पळण्याची त्यांची क्षमता होती. अगदी एखाद्या मोटारकारलाही ते सहज हरवू शकत. **(संकलन : जयराज खोचरे)**

Hello Osmanabad
Page No. 1 Sep 17, 2021
Powered by: erelego.com

---

दिव्य मराठी उस्मानाबाद जिल्हा 26-01-2022

२६ जानेवारी, प्रजासत्ताक अर्थात गणतंत्र दिन. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कर्तृत्ववान, जिल्ह्याचे नाव सबंध राज्यभर किंबहुना देशभर पोहोचवणाऱ्या भूमिपुत्रांचा आलेख मांडण्याचा प्रयत्न 'दिव्य मराठी'ने केला आहे. एकूणच प्रतिकूल परिस्थितीतही काही जणांनी आपल्या असामान्य कर्तृत्व, कौशल्य व बुद्धिमत्तेच्या जोरावर यशश्री खेचून आणली. त्यातून आपली मातीतील लोकांचेही सक्षमीकरण केले. म्हणून या आमच्या माणसांचा अभिमान वाटतो. उस्मानाबादचे लोक म्हणून सांगताना गौरव वाटतो, अशा निवडक व्यक्तिमत्त्वांचा प्रातिनिधिक स्वरूपात परिचय या पुरवणीच्या माध्यमातून करून देण्याचा प्रयत्न.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यातील महान क्रांतिकारक : दत्तोबा भोसले मातोळकर



गिरीश भगत







### दत्तोबा भोसले यांचे सामाजिक व राजकीय विचार (जेल डायरीतून)

## वर्तमान पत्रातील काही लेख


# नकाशे







testbook






हैद्राबाद मुक्ती संग्राम लढ्यातील नकाशांचे काही छायाचित्रे